■ छत्रपती संभाजीनगर वर्ष : २२ • अंक : १२५ • शनिवार, दि. २२ मार्च २०२५ • पाने : ८ • किंमत : ३ रु. RNI.No.MAHMAR/2002/7000 www.gavakari.in gavkarinews.com

पत्रकारितेची ८६ वर्षांची परंपरा

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

स्थापना १९३८


## संक्षिप्त बातम्या

### उद्धव ठाकरेंनीच माझ्यासाठी निरोप पाठवला होता : चित्रा वाघ

**ऑनलाईन नेटवर्क :** भाजप नेत्या चित्रा वाघ आणि शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्यामध्ये आरोप -प्रत्यारोप सुरू असल्याचे पाहायला मिळत आहेत. सुषमा अंधारे यांनी चित्रा वाघ यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला होता, चित्रा वाघ या पक्षप्रवेशासाठी उद्धव ठाकरे यांच्याकडे देखील आल्या होत्या असंही अंधारे यांनी म्हटले होते. त्यानंतर आता पत्रकार परिषद घेऊन चित्रा वाघ यांनी त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसेना ठाकरे गटाचे आताचे आमदार मिलिंद नार्वेकर यांच्याकडे निरोप पाठवला होता. चित्राताई एकदा येऊ भेटा. तुमच्या सारख्या महिला आम्हाला आमच्या पक्षात पाहिजे, मी जाणे न जाणे हा नंतरचा भाग होता. पण त्यांच्या शब्दाला मान म्हणून मी नक्की गेले होते. असे चित्रा वाघ यांनी सांगितले आहे. मी नव्हते गेले तर त्यांनी मला बोलावले होते. आणि याचा खरेपण म्हणजे एकनाथ शिंदे पण होते. असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. त्या म्हणाल्या की, एकनाथ शिंदे हे सर्व कोऑर्डिनेट करतील, त्यामुळे मिलिंद नार्वेकर मला दुसऱ्या दिवशी एकनाथ शिंदे यांच्याकडे देखील घेऊन गेले. तेव्हा मी त्यांना म्हटले की, मला ठरवू द्या, मी अजून विचार केलेला नाही. तेव्हा ते मला म्हणाले नाही-नाही तुम्ही आमच्या पक्षात याच. त्यावेळी तिथे आदित्य ठाकरे देखील होते, असा खुलासाही यावेळी चित्रा वाघ यांनी केला आहे.

# सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू पोलिस मारह्यणीतच !

## मानवाधिकार आयोगाकडे न्यायदंडाधिकाऱ्यांचा अहवाल सादर; संबंधितांना नोटिसा जारी

**मुंबई** - परभणीमधील सोमनाथ सूर्यवंशींचा मृत्यू संदर्भात मोठी माहिती समोर आली आहे. सोमनाथ सूर्यवंशींचा मृत्यू हा पोलिसांच्या मारहाणीतच झाला असून या मृत्यूला पोलीसच जबाबदार असल्याचे आता पुढे आले आहे. दंडाधिका-यांचा चौकशीचा अहवाल माध्यमांमध्ये प्रसारित झाला असून असून परभणी जिल्ह्यातील नवामोंढा पोलीस ठाण्यातील मारहाणीच्या प्रकरणाचा नवा पैलू समोर आला असून यामुळे सूर्यवंशी कुटूंबीयांनी पोलिसांवर केलेल्या आरोपात तथ्य असल्याचे समोर आले आहे. सोमनाथ सूर्यवंशी या विद्यार्थ्याने परभणीत राज्यघटनेच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्यानंतर आंदोलनात भाग घेतला होता.



त्यानंतर त्याला पोलिसांनी अटक केली व नंतर कोठडीत त्याचा मृत्यू झाला होता.

पोलीस कोठडीत अमानुष मारहाण झाल्याने सोमनाथचा मृत्यू झाला असून यामुळे आम्हाला सरकारची मदत नको, पण दोषींवर कारवाई हवी आहे, अशी ठाम भूमिका सोमनाथ यांच्या आई विजयाबाई सूर्यवंशी यांनी घेतली आहे. तर दोषी पोलीसांवर कठोर कारवाईची मागणी कुटुंबिय सातत्याने करत आहेत. परभणी हिंसाचार प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशीच्या कोठडीतील मृत्यूने राज्यभरात मोठी खळबळ उडाली होती. पोलिसांच्या अमानुष मारहाणीत सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू झाला, असा आरोप सातत्याने करण्यात आला होता. मात्र हृदयविकाराचा झटका आल्याने त्याचा मृत्यू झाल्याचा दावा प्रशासनाने केला होता. यानंतर शवविच्छेदनाच्या प्राथमिक अहवालावरून, पोलिसांच्या मारहाणीमुळेच सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू झाल्याचे उघड झाल्यानंतर परभणीत एका पोलीस अधिकाऱ्यासह २ पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले. जवळपास दोन महिन्यांनी ही कारवाई करण्यात आली होती. अशातच आता न्याय दंडाधिका-यांचा चौकशीचा अहवालातून धक्कादायक माहिती समोर आल्याने यात पोलिसांवर आता नेमकी काय कारवाई होते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### पोलीस ठाण्यातील मारहाणीत मृत्यू !

परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू मारहाणीत झाला आहे. न्यायदंडाधिकाऱ्यांच्या अहवालात पोलिसांवर हा ठपका ठेवण्यात आला आहे. परभणीच्या नवामोंढा पोलीस ठाण्यात सोमनाथ सूर्यवंशीना मारहाण करण्यात आल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. गोपनीय अहवाल राज्य मानवाधिकार आयोगासमोर सादर करण्यात आला. आयोगाने संबंधित सर्व पोलिसांना नोटीसा बजावून उत्तर मागितले आहे. ''परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूला पोलीस जबाबदार आहेत. त्यांना परभणी जिल्ह्यातील नवामोंढ पोलीस ठाण्यात मारहाण करण्यात आली'' असा निष्कर्ष न्यायदंडाधिकाऱ्यांनी त्यांच्या चौकशीतून काढला आहे.


### साडेचारशे पानांचा गोपनीय अहवाल

न्यायदंडाधिकाऱ्यांचा ४५१ पानी गोपनीय अहवाल राज्य मानवाधिकार आयोगासमोर सादर करण्यात आला. आयोगानेही त्याची गंभीर दखल घेत संबंधित सर्व पोलीसांना नोटिसा बजावून त्यांच्याकडून उत्तर मागितले आहे. सोमनाथ यांचा १५ डिसेंबर रोजी कोठडीत असताना तुरुंगात मृत्यू झाल्यापासून हे प्रकरण तापलेले आहे. तर पोलिसांनी केलेल्या अमानुष मारहाणीतच हा मृत्यू झाला आहे. त्या संदर्भात सूर्यवंशींच्या शरीरावर अनेक जखमाही होत्या, असे शवविच्छेदन अहवालातून समोर आले आहे. मात्र राज्य सरकारने अद्याप एकाही पोलीस अधिका–यावर कारवाई केलेली नाही.

# खंडणीचे एक कोटी घेताना महिलेला अटक

## मंत्री जयकुमार गोरेंच्या प्रकरणात मोठा ट्विस्ट; ३ कोटींची खंडणी मागितल्याचे समोर

**सातारा** - राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्यावर एका महिलेने गंभीर आरोप केले होते. गोरे यांनी आपल्याला नग्न फोटो पाठवल्याचं महिलेने मीडियासमोर सांगत खळबळ उडवली होती. मंत्री झाल्यावर गोरेंनी आपल्याला पुन्हा त्रास द्यायला सुरूवात केल्याचा आरोप संबंधित महिलेने केला होता. अशातच या प्रकरणामध्ये मोठी अपडेट समोर आली आहे. मंत्री जयकुमार गोरे यांच्यावर आरोप करणाऱ्या महिलेला पोलिसांनी अटक केली आहे. संबंधित महिलेने हे प्रकरण दाबण्यासाठी ३ कोटी रूपयांची खंडणी मागितली होती. त्यामधील एक कोटी घेत



असताना पोलिसांनी अटक केल्याची प्राथमिक माहिती समोर आल्याने या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे.

माण-खटाव मतदारसंघाचे आमदार जयकुमार गोरे यांनी २०१६ पासून फक्त सरसेनापती

पान २ वर

### कायद्याचा पूर्णपणे गैरवापर

युट्यूब चॅनेलचे पत्रकार तुषार खरात यांना अटक करण्यात आली होती. गोरे यांच्याविरोधात एकतर्फी बातमी केल्याचा आरोप तुषार खरात यांच्यावर करण्यात आला होता. मात्र आता संबंधित महिलेला खंडणी प्रकरणात अटक झाल्याने दुहेरी चर्चा रंगल्या आहेत. ज्या प्रकारे त्या पत्रकाराला अटक केली त्या प्रकारे त्या महिलेला अटक केली. कायद्याचा पूर्णपणे गैरवापर आहे. महाराष्ट्र हे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली पोलीस स्टेट बनलेलं आहे. पोलीस काही करतात त्यांना कोणतेही आदेश देण्यात येतात, असं म्हणत संजय राऊत या अटकेवर आपली प्रतिक्रिया दिली आहे.

# पवारांनी शिंदेंचा सत्कार केल्याचे दु:ख

## आदित्य ठाकरे यांनी मनातील सल केली व्यक्त ; आदर असल्याची भावना



**मुंबई -** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्या हस्ते काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्कार करण्यात आला होता. ही घटना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्यांच्या मनाला लागली होती. विशेष म्हणजे याबाबतची सल आजही ठाकरे गटाच्या नेत्यांच्या मनात आहे. आमदार आदित्य ठाकरे यांनी एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत याबाबतची खदखद व्यक्त करुन दाखवली. शरद पवार यांनी एकनाथ शिंदे यांचा सत्कार केला याचे दु:ख झाल्याचे आदित्य ठाकरे यांनी मान्य केले. यामुळे ठाकरे गटाच्या मनात शरद पवार गटाबाबत काय चाललंय याची प्रचिती येत आहे.

### वाईट याच गोष्टीचे वाटते...

आम्ही एक भावनिक पक्ष आहोत. आम्ही पक्षाला कुटुंब म्हणून मानतो. जे कुणी सोडून गेले ते एकेकाळी खूप जवळचे होते. त्यांच्या काय भानगडी आणि गडबडी आहेत ते आम्हाला माहिती आहे. ते सांगून काही काही लोक पळाली तर आता मंत्रीदेखील झाले. काही लोकं असेच न सांगता पळाले. काही लोक फ्रँकी खाऊन पळाले. म्हणून वाईट याच गोष्टीचे वाटते जेव्हा आम्ही तुम्हाला आमचे मानतो आणि तुम्ही जावून पलटतात आणि गद्दारी करुन आमच्यावरच वार करतात'', असे आदित्य ठाकरे म्हणाले.




## संक्षिप्त बातम्या

### जिल्ह्यातील ग्रामीण भागात मनाई आदेश

**छत्रपती संभाजीनगर :** आगामी सणांच्या पार्श्वभुमिवर कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी हे आदेश निर्गमित केले असून दि.७ एप्रिल पर्यंत हे आदेश अंमलात राहतील,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा जिल्हा दौरा

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय सामाजिक न्याय व सशक्तीकरण राज्यमंत्री रामदास आठवले हे शनिवारी (दि.२२) जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम या प्रमाणे - शनिवारी दुपारी अडीच वाजता सुभेदारी शासकीय विश्रामगृह येथे शिर्डी येथून आगमन व समाज कल्याण अधिकारी यांच्या समवेत बैठक, त्यानंतर राखीव. दुपारी साडेतीन वाजता सुभेदारी विश्राम गृह येथे पत्रकार परिषद, दुपारी साडेचार वाजता नागसेन वन येथे पॉलिटेक्निक कॉलेजचे उद्घाटन, सायं. पावणे सहा वाजता सुभेदारी विश्राम गृह येथे आगमन व राखीव, सायं. ७ वा. १० मि. नी छत्रपती संभाजीनगर विमानतळ येथून विमानाने दिल्लीकडे रवाना.

### विवाहितेचा छळ

**छत्रपती संभाजीनगर :** चारचाकी घेण्यासाठी माहेरहून पैसे आण असा तगादा लावत विवाहीतेचा छळ केल्याची घटना १८ मे २०१८ ते २७ डिसेंबर २०२४ दरम्यान भूजबळनगर न्यू नंदनवन कॉलनीत घडली. याप्रकरणी २८ वर्षीय विवाहीतेने फिर्याद दिली. त्यानूसार, पीडितेला पतीसह तिच्या सासरच्यांनी चारचाकी घेण्यासाठी माहेरहून पैसे आण असा तगादा लावत पीडितेचा छळ केला. तसेच वारंवार तिला शिवीगाळ करुन मारहाण केली. याप्रकरणी विवाहीतेचा पती संदिप बाबुराव थोरात (३३) यासह सासरा बाबुराव किसन थोरात (५५), सासु पंचशीला थोरात (५०) आणि नणंद शिल्पा ईश्वर गायकवाड (३६) यांच्या विरोधात वाळूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर

**छत्रपती संभाजीनगर :** भरधाव ट्रकने पाठीमागुन दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. हा अपघात १३ मार्च रोजी सकाळी पावणेबारा वाजेच्या सुमारास जुबिली पार्क सिग्नल जवळ घडला. याप्रकरणी जखमी राहुल रमेश बचके (३९, रा. भिमनगर, भावसिंगपुरा) यांनी फिर्याद दिली. त्यानूसार, फिर्यादी हे दुचकीवरून जात असतांना पाठीमागुन येणाऱ्या ट्रकच्या चालकाने ट्रक भरधाव व निष्काळजीपणे चालवून फिर्यादीच्या दुचाकीला पाठीमागून जोराची धडक देत तेथून पसार झाला. अपघातात फिर्यादीचा पाय तुटला तसेच चेहऱ्यावर देखील गंभीर जखमी होऊन त्यांच्या दुचाकीचे देखील नुकसान झाले. याप्रकरणी अज्ञात ट्रक चालकाविरोधात सिटीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रहदारीस अडथळा : दोन रिक्षा चालकांवर कारवाई

**छत्रपती संभाजीनगर :** रस्त्यात वाहने उभी करुन रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या दोन रिक्षा चालकांवर कारवाई करुन वेदांतनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई १९ मार्च रोजी रात्री १० ते १०.३० वाजेच्या सुमारास रेल्वस्टेशन परिसरातील सेल्स टॅक्स कार्यालयासमोर करण्यात आली. अबुबकर मुजीब शेख (३३, रा. महमदी चौक, सिल्कमिल कॉलनी) आणि अब्दुल अजीम कादीर शहा (३०, रा. शहानुरवाडी दर्गा रोड, उस्मानपुरा) अशी रिक्षाचालकांनी नावे आहेत.

### चंदनाचे झाड चोरीला

**छत्रपती संभाजीनगर :** फार्म हाऊसमध्ये लावलेले १० हजारांचे चंदानाचे झाड चोरट्यांनी तोडून नेल्याची घटना १९ मार्च रोजी मध्यरात्री ते पहाटे पाच वाजेच्या दरम्यान मिटमिटा परिसरातील गट क्रं. २२८ येथे घडली. याप्रकरणी विलास उत्तमराव सिरसाठ (५६, रा. माजी सैनिक कॉलनी, पडेगाव) यांनी फिर्याद दिली. त्यानूसार, मिटमिटा परिसरातील गट क्रं. २२८ येथे फिर्यादीचे फार्म हाऊस आहे. या फार्म हाऊसमध्ये चंदनाचे झाड लावलेले होते. ते झाड १९ मार्च रोजी चोरट्यांनी तोडून नेले. याप्रकरणी छावणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जमाव बंदीच्या आदेशाचे उल्लंघन, मारहाण करणाऱ्यांसह लॉन मालकावर गुन्हा

**छत्रपती संभाजीनगर :** रंगपंचमी निमीत्ताने शहरात जमावबंदीचे आदेश असतांना देखील लॉनवर कार्यक्रम घेण्यासा परवानगी देणाऱ्या आणि लॉनवर हाणामारी करणाऱ्या अशा लॉन मालकासह चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई १४ मार्च रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास बीड बायपास रोडवरील हिवाळे लॉन्स वर करण्यात आली. विशाल शाहु आव्हाड (२१, रा. प्रियदर्शनी इंदिरानगर), ऋषीकेश प्रशंता अण्णदाते (२४, पिसादेवी, जयहिंद नगरी), अंश राऊत (रा. बजाजनगर) असे मारहाण करणारे तर अप्पासाहेब हिवाळे असे लॉन मालकाचे नाव आहे.याप्रकरणी सातारा पोलिस ठाण्याचे अंमलदार जमील रफीक शेख (३९) यांनी फिर्याद दिली. त्यानूसार, रंगपंचमी निमीत्त शहरात जमाबंदीचे आदेश असतांना त्याचे उल्लंघन करुन लॉनवर विनापरवाना रंगपंचमीचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात विशाल आव्हाड, ऋषीकेश अण्णदाते आणि अंश राऊत यांच्यात आपसात हाणामारी झाली. त्यामुळे हाणामारी करणाऱ्यांसह लॉनवर कार्यक्रम घेणाऱ्या हिवाळे लॉन्स चा मालक अप्पासाहेब हिवाळे याच्या विरोधात सातारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# औरंगजेब कबर प्रकरण : एनआयएचे पथक शहरात दाखल

## जालना, नांदेड, परभणी, बीड, उदगीर या ठिकाणी पथक ठेवणार लक्ष

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**



संग्रहित छायाचित्र

खुलताबाद येथील औरंगजेब कबरीवरून राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच तापलेले असून याप्रकरणावरून नागपूरमध्ये आंदोलनानंतर दंगल घडली. या घटनांचे गांभीर्य लक्षात घेता एनआयएचे पथक छत्रपती संभाजीनगर शहरात दाखल झाले आहे. कबर असलेल्या खुलताबाद शहरासह मराठवाड्यातील जालना, नांदेड, परभणी, बीड, उदगीर या ठिकाणी देखील पथकाचे बारीक लक्ष असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

औरंगजेब याची कबर खुलताबाद येथे असून ही कबर काढून टाकण्यात यावी, अशी मागणी महायुतीतील घटक पक्षांसह विविध हिंदुत्ववादी पक्ष संघटनांनी केली आहे. तसेच यासंदर्भात बजरंग दल व विश्व हिंदू परिषदेने अल्टिमेटम देत महाराष्ट्रामध्ये आंदोलने केली. यात नागपूर येथे आंदोलनानंतर दंगल उसळली होती. औरंगजेबाची कबर व नागपूर येथे झालेली दंगल या घटनांचे गांभीर्य लक्षात घेत, एनआयएचे पथक छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात दाखल झाले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या पथकाकडून छत्रपती संभाजीनगरसह खुलताबाद येथील हालचालींवर विशेष लक्ष ठेवले जात आहे. त्याचबरोबर मराठवाड्यातील बीड, नांदेड, परभणी, जालना, उदगीर या जिल्ह्यांमध्ये देखील एनआयएची तीन विशेष पथके लक्ष ठेवून आहेत. तसेच मराठवाड्याला लागून असलेल्या विदर्भात बुलढाणा या जिल्ह्यात देखील या पथकाचे विशेष लक्ष आहे. दरम्यान औरंगजेब कबर परिसरात एसआरपीएफचे ११५ शस्त्रधारी जवान, दंगल नियंत्रण पथकातील २५ पोलिस जवान, ६० पोलिस अंमलदार, महिला पोलिस, भारतीय पुरातत्त्व विभागाचे खासगी सुरक्षारक्षक असा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. औरंगजेब कबर परिसरातील रस्त्यावर दोन ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली असून, औरंगजेब कबर पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांची नोंद केली जात आहे.

### सोशल मीडियावर बारकाईने लक्ष

सोशल मीडियाबाबत पोलिस अत्यंत दक्ष असून चुकीची माहिती अथवा भावना भडकवणाऱ्या मजकुरावर सायबर सेलचे बारकाईने लक्ष आहे. अशा वादग्रस्त पोस्ट शेअर करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी दिला आहे. तसेच प्रत्येक गावातील पोलीस पाटलांनी त्यांच्यामार्फत १८००२७०३६०० या ग्रामसुरक्षा ॲपवर माहिती द्यावी. शिवाय नागरिक ११२ या क्रमांकावरही आपल्याकडील माहिती देऊ शकतात. आपल्या परिसरात शांतता राखणे हे आपले कर्तव्य असून नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही राठोड यांनी केले आहे.

# प्रत्येक दिवशी ग्राहकाने सजग राहणे गरजेचे !



### जागतिक ग्राहक दिन कार्यक्रमात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे प्रतिपादन

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

आपण प्रत्येक जण दररोज, प्रत्येक क्षणी ग्राहक असतो. अशावेळी ग्राहक म्हणून आपली फसवणूक टाळण्यासाठी प्रत्येक दिवशी ग्राहकाने सजग राहणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन शुक्रवारी (दि.२१) जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

जागतिक ग्राहक दिना (दि.१५ मार्च) निमित्त शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती शिल्पा डोल्हारकर, अपर जिल्हाधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, सहा. आयुक्त अन्न व औषध प्रशासन अनित मैत्रे, मोटार वाहन निरीक्षक संगिता पवार, उपजिल्हाधिकारी श्रीमती संगिता राठोड, सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी संदीप शिंदे, अन्न धान्य वितरण अधिकारी श्रीमती भारती वाकोडे आदी तसेच ग्राहक परिषदेचे अशासकीय सदस्य उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रवीण फुलारी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सायबर पोलीस दलाचे गणेश घोरपडे यांनी यावेळी सायबर गुन्हेगारी व त्याद्वारे होणारे फसवणूकीचे प्रकार या विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, आपण खरेदी करीत असलेली वस्तू, तिची गुणवत्ता, उपयुक्तता, विक्री पश्चात सेवा इत्यादीबाबत तपास्णी कशी करावी याविषयी ग्राहकांनी एकमेकांना मार्गदर्शन करावे. यातुनच ग्राहक चळवळ बलवान होईल. त्यानंतर शिल्पा डोल्हारकर यांनी ग्राहक हक्क कायद्याविषयी माहिती देऊन उपस्थितांचे प्रबोधन केले.

# जुन्या शहराला आज मिळणार पाणी

### १४०० च्या जलवाहिनीची दुरुस्ती पूर्ण, मध्यरात्रीपासून जलकुंभ भरणार

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

जून्या शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या १४०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीला रेल्वेस्टेशन उड्डाणपूलाखाली गळती लागली होती. या दुरुस्तीचे काम शुक्रवारी (दि. २१) रात्री १० वाजेपर्यंत पूर्ण होणार आहे. त्यानंतर मध्यरात्रीपासून या जलवाहिनीतून जून्या शहरातील जलकुंभांमध्ये पाणी आणले जाणार असून शनिवारी (दि. २२) सकाळपासून पाणी वितरीत केले जाणार असल्याची माहिती महापालिका पाणीपुरवठा विभागाद्वारे देण्यात आली आहे.

रेल्वेस्टेशन उड्डाणपुलाखाली १४०० मिलीमीटर व्यासाच्या जलवाहिनीला लागलेल्या गळतीची दुरुस्ती करण्यासाठी महापालिकेने तीस तासांच्या शटडाऊनची घोषणा केली. गुरुवारी सकाळी दहा वाजेपासून हा शटडाऊन सुरु झाला. काम पूर्ण झाल्यावर शहरापर्यंत पाणी येण्यासाठी किमान सहा तास लागतील असेही मनपाने स्पष्ट केले होते. त्यानुसार दुरुस्तीचे काम पूर्ण झाले आहे. मात्र, वाढत असलेली उन्हाची तीव्रता आणि एकदम घेण्यात आलेला ३६ तासांचा खंडणकाळामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. खंडणकाळात केवळ रेल्वेस्टेशन उड्डाणपुलाखालील जलवाहिनीच्या दुरुस्तीचेच काम करण्यात आले असे नाही तर नक्षत्रवाडी एमबीआर येथील वाय जंक्शन पाईप बदलून एकच पाईट टाकण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. रेल्वेस्टेशन समोरील व्हॉल्व्हची दुरुस्ती, महापौर बंगल्यासमोरील व्हॉल्व्हची दुरुस्ती, फारोळा जलशुध्दीकरण केंद्रातील सीएलएफची स्वच्छता आदी कामे देखील केली जात आहेत. या कामांमुळे जुन्या शहराचा पाणी पुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे.

### दोन दिवसांपासून जलकुंभ कोरडे

कोटलाकॉलनी, क्रांतीचौक, शहागंज, जिन्सी, वेदांतनगर, ज्युबलीपार्क, हनुमाननगर या ठिकाणचे जलकुंभ कोरडे पडले आहेत. या जलकुंभांच्या माध्यमातून जुन्या शहरातील फार मोठ्या वसाहतींना पाणी पुरवठा होतो. शटडाऊनमुळे या वसाहतींचा पाणी पुरवठा किमान ३६ तासांसाठी व कमाल चाळीस ते पंचेचाळीस तासांसाठी ठप्प झाला आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना पाणीबाणीला सामोरे जावे लागत आहे.

# शहरात दुचाकी चोरांचा सुळसुळाट; विविध भागातून सात दुचाकी चोरीला

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

शहरात दुचाकी चोरीच्या घटनात वाढ झाली असून चोरट्यांनी शहराच्या विविध भागातून सात दुचाकी चोरून नेल्याच्या घटना समोर आल्या आहेत. याप्रकरणी संबंधित पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरात दुचाकी चोरांचा सुळसुळाट झाला असून तात्यासाहेब शिवाजी गायकवाड यांची दुचाकी ( एम.एच.२५ वाय ६०७९) ८ मार्च रोजी सायंकाळी पावणे पाच ते साडेसहा वाजेदरम्यान सिडको एन आठ, बाळासाहेब ठाकरे उद्यानासमोरील रस्त्यावर उभी केली होती. ती चोरट्यांनी चोरून नेली. याप्रकरणी सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर फिर्यादी कृष्णा सुर्यप्रकाश जंगले यांची प्रोझोन मॉल समोरील रस्त्यालगत उभी केलेली दुचाकी (एम.एच. २३ एझेड ५७९७) चोरट्यांनी १९ मार्च रोजी रात्री सात ते साडेआठ वाजेच्या सुमारास लांबवली. याप्रकरणी एमआयडीसी सिडको पोलिस ठाण्यात गुनहा दाखल करण्यात आला आहे. तर वाहन चोरीची तिसरी घटनेत राजनगर, मुकुंदवाडी येथील रमेश कडुबा गायकवाड यांची घरासमोर उभी असलेली दुचाकी चोरट्यांनी १७ ते १८ मार्च दरम्यान पळवून नेली. याप्रकरणी मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच बुढ्ढीलेन भागातील शेख नदीम तांबोली यांची दुचाकी (एम.एच. ईड्ब्ल्यू ५८२०) चोरांनी १६ मार्च रोजी सायंकाळी सहा ते सात वाजेच्या सुमारास नेहरु भवन, बुढ्ढीलेन परिसरातुन चोरून नेली. याप्रकरणी सिटी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासह मोहम्मद इब्राहिम अब्दुल नसीर शेख यांची दुचाकी ( एम.एच. २० सीडब्ल्यू ३९८८) चोरट्यांनी ७ मार्च रोजी रात्री साडेआठ ते साडेदहाच्या सुमारास आमखास मैदानासमोरुन पळवून नेली. याप्रकरणाची नोंद सिटी चौक पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. तर संदीप बापुराव पंडीत यांनी सिटी केअर हॉस्पिटलसमोर उभी केलेली त्यांची दुचाकी (एम.एच. १६ सीबी ०८२२) चोरांनी १७ मार्च रोजी सव्वापाच वाजेच्या सुमारास लंपास केली. याप्रकरणी उस्मानपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर भागवत सुंदराव जाधव यांची दुचाकी (एम.एच. २० जीए ९८३५) चोरट्यांनी मध्यवर्ती बसस्थानक परिसरातील शाग्रील हॉटेलसमोरुन चोरून नेली. याप्रकरणी क्रांतीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# घरात चोरी, नणंदेसह नातेवाईकांवर संशय, गुन्हा दाखल

**छत्रपती संभाजीनगर :** घरात चोरी करुन शेजारी राहणाऱ्या नातेवाईकांनी २५ हजारांच्या रोख रक्कमेसह २ लाख ३५ हजारांचा ऐवज चोरुन नेल्याचा संशय वर्तविण्यात आला आहे. याप्रकरणी संशयावरुन शेजारी राहणारी नणंद अरुणा अशोक सातपुते, नंदोई अशोक देवबा सातपुते, भाया सुनिल शांताराम वाघ आणि जाऊ लिला सुनिल वाघ यांच्या विरोधात एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी बजाजनगरातील एफडीसी हौ. सो जवळ राहणाऱ्या सरीता रमेश वाघ (३८) यांनी फिर्याद दिली. त्यानूसार, फिर्यादीच्या घरातून गॅस शेगडीसह शिलाई मशीन, सायकल, कुलर, मुलांसाठी बचत केलेली २५ हजारांची रोख रक्कम, मुलांची शालेय कागदपत्रे इतर घरगुती सामान असा सुमारे २ लाख ३५ हजार रुपये किंमतीचा ऐवज वरिल नातेवाईकांनी चोरुन नेला असा संशय फिर्यादीने व्यक्त केला होता. त्यासंदर्भात फिर्यादीने पोलिस ठाण्यात आणि गृहमंत्री यांच्याकडे देखील दाद मागितली होती. दरम्यान १८ फेब्रुवारी रोजी फिर्यादीला पोलिसांनी लेखी समज पत्र दिले, त्यात त्यांनी हा दिवाणी स्वरुपाचा दावा असल्याने यात चोरी झाल्याचे निष्पन्न होत नसल्याचे सांगून न्यायालयात दाद मागण्याबाबत कळवले. मात्र या नोटीसीने फिर्यादीचे समाधान झाले नसल्याने फिर्यादीने पोलिस ठाणे गाठून दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मालमत्ता कराच्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा न्यायालयात आज महालोक अदालत

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

महापालिकेने एक लाखापेक्षा अधिक कर थकीत असलेल्या साठेआठ हजार मालमत्ताधारकांना जप्तीच्या नोटीसा पाठवून ही सर्व प्रकरणे विधी सेवा प्रधिकरणाकडे वर्ग करण्यात आली. विधी सेवा प्राधिकरणाने मालमत्ता कराच्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा न्यायालयात आज शनिवारी (दि.२२) महालोक अदालत भरविण्यात येणार आहे. ज्या मालमत्ताधारकांना नोटीसा मिळालेल्या आहेत, त्यांनी महालोकअदालतमध्ये हजर राहून अडचणी सोडवाव्यात असे आवाहन महापालिकेने केले आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यांनी यावर्षी मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या वसूलीचे उद्दिष्ट ५०० कोटी रुपये दिले आहे. मालमत्ता कर संकलन व निर्धारक तथा उपायुक्त अपर्णा थेटे यांनी मालमत्ता कर आणि पाणीपट्टी वसूलीसाठी सुक्ष्म नियोजन केले. ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. त्यानंतर एक लाखापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकांना एक ते चार च्या नोटीसा बजावण्यात आल्या. त्यानंतरही मालमत्ताधारकांनी थकीत कर भरला नाही म्हणून त्यांना मालमत्ता जप्त करून त्याचा जाहीर लिलाव करण्याची नोटीस बजावण्यात आली. विधी सेवा प्राधिकरणाकडे साठेआठ हजार प्रकरणे वर्ग करून त्यांना न्यायालयाची नोटीस देण्यात आली. न्यायालयात म्हणणे मांडण्यापूर्वी मनपा प्रशासक तथा आयुक्त यांनी कर समाधान शिबीर घेतले. तसेच तीन दिवस महाकर समाधान शिबीर घेण्यात आले. त्यानंतरच आज शनिवारी काळी दहा वाजता जिल्हा न्यायालयात महालोक अदालत भरविण्यात येणार आहे. या महालोकअदालतमध्ये विधी सेवा प्राधिकरणाकडून नोटीस मिळालेल्या मालमत्ताधारकानी हजर होऊन त्यांच्या अडचणी मांडाव्यात या अडचणी जागेवर सोडविल्या जातील. त्यासाठी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, उपायुक्त अपर्णा थेटे, यांच्यासह झोन कार्यालयाचे सहायक आयुक्त व पॅनलवरील अधिकारी उपस्थित राहणार आहे. या महालोकअदालतमध्ये मालमत्ताधारकांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# तिसगाव चौफुलीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**



तिसगाव येथील चौफुलीवर भीमसैनिकांच्या स्वखर्चातून उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे गुरूवारी (दि.२०) रात्री मोठ्या उत्साहात अनावरण करण्यात आले. या ऐतिहासिक सोहळ्यात पंचक्रोशीतील हजारो भीमसैनिकांनी हजेरी लावली होती.

औद्योगिक वसाहत वाळूजवळील तिसगाव चौफुलीवर गुरूवारी रात्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण एका ज्येष्ठ व्यक्तीच्या हस्ते अनावरण करण्यात आले. विशेष म्हणजे, सरकारी मदतीशिवाय हा पुतळा स्थानिक जनतेच्या योगदानातून साकारला गेला. अनेक वर्षे राजकीय पुढाऱ्यांनी आश्वासने दिली, पण ती हवेत विरली. अखेर, लोकचळवळीतून समाजबांधवांनी आर्थिक योगदान देत हा पुतळा साकारला. या अनावरण सोहळ्यास कोणीही प्रमुख पाहुणा नव्हता, कारण उपस्थित प्रत्येक भीमसैनिक स्वतःच प्रमुख होता. दरम्यान सुमारे दोन वर्षांपासून पुतळा उभारणीसाठीचा केवळ चबुतरा बांधून तयार होता. मात्र, पुतळा नसल्याने परिसरातील नागरिकांनी यासाठी पुढाकार घेतला होता. राजकीय नेता, मंत्री अथवा सरकारी मदतीशिवाय प्रत्याक्षात पुताळा अनावर होत असल्याचे पाहुन अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. याप्रसंगी अंजन साळवे, सोमनाथ महापुरे, सतीश महापुरे, रमेश दाभाडे, अंबादास निकम, यशपाल कदम, सुर्यकांत पठारे यांच्यासह असंख्य भीमसैनिक उपस्थित होते.

# महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील अनधिकृत भूखंड, बांधकामांचे होणार सर्वेक्षण

### महानगर आयुक्त तथा विभागीय आयुक्तांची माहिती

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात अनाधिकृत भूखंड तसेच बांधकामाबाबत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मदतीने सर्वेक्षण करण्यात येणार आहे. महानगर क्षेत्रात सर्वेक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन शुक्रवारी (दि.२१) आयुक्त दिलीप गावडे यांनी केले आहे. विभागीय आयुक्त कार्यालयात छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील विना परवानगी भूखंड तसेच बांधकाम सर्वेक्षणाबाबत गावडे यांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर्वेक्षणासाठी सेवा देणारे विद्यार्थी तसेच अधिकाऱ्यांशी संवाद साधला, यावेळी महानगर नियोजनकार हर्षल बावीस्कर, सह महानगर नियोजनकार रविंद्र जायभाये यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी महानगर आयुक्त गावडे म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात अनाधिकृत, विना परवाना भूखंड व बांधकामाबाबत सर्वेक्षण करण्यात येणार आहे. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी सर्वेक्षणासाठी आपली सेवा देणार आहेत. कमवा व शिका योजनेच्या धर्तीवर शैक्षणिक अभ्यासक्रमावर कोणत्याही प्रकारचा परिणाम न होऊ देता विद्यार्थी सर्वेक्षणाचे काम करणार आहेत. या सर्वेक्षणा अंतर्गत महानगर क्षेत्रात नागरिकांकडे विद्यार्थी जातील त्यावेळी नागरिकांनी आपल्याकडील या संदर्भातील कागदपत्रे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याबरोबरच सर्वेक्षणातील प्रश्नावली बाबत अचूक माहिती द्यावी. जेणेकरून नियमाप्रमाणे भूखंड तसेच बांधकाम नियमित करण्याकामी मदत होणार आहे. अनधिकृत भूखंड तसेच बांधकाम नियमित झाले तर गरजूंना या मालमत्तेवर बँकेकडून कर्ज मिळणेही सुलभ होणार आहे. तसेच ज्यांना सदर मालमत्तेची विक्री करावयाची असल्यास विक्री करणेही सुलभ होईल. त्यामुळे नागरिकांनी या सर्वेक्षण मोहिमेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना सहकार्य करावे, असे आवाहनही विभागीय आयुक्त तथा महानगर आयुक्त गावडे यांनी केले.

### भूखंडाबाबतची ही विचारणार माहिती...

सर्वेक्षणाअंतर्गत विद्यमान वापर, भूखंड धारकांचे नाव, भूखंड क्रमांक, गट क्रमांक, मालकी हक्काबाबतची कागदपत्रे, बांधकाम परवानगी, सातबारा उतारा, भूमी अभिलेख कार्यालयाकडील मोजणी, ग्रामपंचायत ८ अ उतारा, वीज देयक , लेआऊट प्रत, भूखंडाचे क्षेत्रफळ, बांधकामाचे क्षेत्रफळ, भूखंड तसेच बांधकामाचा कच्चा नकाशा, मिळकतीचे वर्णन याबाबतची माहिती संकलित केली जाणार आहे.

## संपादकीय

# सुस्वागतम्



अंतराळात अडकून पडलेली अमेरिकेची अंतराळवीर आणि भारतीय वंशाची सुनीता विल्यम्स आणि तिचा सहकारी बुच विल्मोर हे पृथ्वीवर परत कधी येणार? याची उत्सुकता साऱ्या जगाला लागली होती. विशेषतः भारतीय आणि अमेरिकन नागरिकांना त्यांच्या भवितव्याची चिंता लागली होती. दोघे परत येतील काय? येणार असतील, तर कधी? ते दोघे अंतराळातच राहणार काय? त्यांचे भवितव्य काय? असे नानाविध प्रश्न उपस्थित करण्यात येत होते. यामागचे कारण म्हणजे केवळ आठ दिवसांच्या मोहिमेसाठी हे दोघे अंतराळात गेले होते. पण, काही तांत्रिक कारणांमुळे त्यांना तब्बल नऊ महिने अडकून पडावे लागले. त्यांना सुरक्षितपणे पृथ्वीवर आणण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न करण्यात येत होते. अखेर प्रयत्नांना यश आले. सुनीता आणि तिचा सहकारी विल्मोर परत आल्याने त्यांचा नवा जन्म झाल्याचे आता मानले जात आहे. सुनीता विल्यम्स या भारतीय वंशाच्या असल्याने भारतीयांनासुद्धा आनंद झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्यासोबतचा एक जुना फोटो शेअर करत आनंद व्यक्त करत त्यांच्या धाडसाचे कौतुकही केले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही दोघांचे अभिनंदन केले. विशेष म्हणजे ते अध्यक्ष झाल्यानंतर अंतराळात अडकून पडलेल्या अंतराळवीरांना वाचविण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. त्यांचे सल्लागार एलॉन मस्क यांची त्यांनी मदत घेतली. माजी अध्यक्ष जो बायडेन यांनी त्यांना सोडून दिले, अशी राजकीय टिप्पणीही करण्यास ट्रम्प विसरले नाहीत. जे वचन दिले होते ते पूर्ण केले आहे, असे म्हणत त्यांनी एलॉन मस्क, स्पेसएक्स आणि नासाचे आभार मानले. सुनीता विल्यम्सने अनेक अंतराळ मोहिमा यशस्वीपणे पूर्ण केल्या. त्यातील ही सर्वात कठीण मोहीम होती. दोघे अडकून पडले. नऊ महिन्यांच्या कालावधीचा योग्य उपयोग करून त्यांनी वेगळ्या प्रकारचे संशोधनही केले. या कालावधीत सुनीताने १७ ते १८ वेळा स्पेसवॉक (अवकाशात चालणे) केला. इतक्या वेळा अंतराळामध्ये स्पेसवॉक करणारी ती पहिली महिला अंतराळवीरही ठरली. अमेरिकेच्या नासा या अंतराळ संशोधन संस्थेमध्ये काम करणार्या सुनीताची आतापर्यंतची कामगिरी अशाच प्रकारची देदीप्यमान आणि प्रेरणादायी आहे. अमेरिकन हवाई दलात काम करणार्या सुनीताने आपल्यातील लढावूवृत्ती समोर आणल्यामुळेच तिला अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात नासातर्फे संधी देण्यात आली. सुनीता विल्यम्स आणि तिचा सहकारी विल्मोर आठ दिवसांच्या मोहिमेसाठी अवकाशात झेपावले तेव्हा अडकून पडण्याचे संकट निर्माण येणार, याची त्यांना कल्पनाही नसेल. अर्थात, अंतराळ मोहीम जोखमीची असते. आठ दिवसांनंतर पृथ्वीवर परतण्याची जेव्हा वेळ आली तेव्हा तांत्रिक बिघाडामुळे आपण पृथ्वीवर परत येऊ शकणार नाही हे त्यांना समजले होते. परंतु, त्यांनी धीर सोडला नाही. आपण लवकरच पृथ्वीवर पोहचू हा विश्वास त्यांच्यामध्ये होता. पण, तब्बल नऊ महिने अडकून पडावे लागेल, असे त्यांना वाटलेही नसेल. महिनाभरात तांत्रिक बिघाड दुरुस्त होईल, असे त्यांना वाटत असेल. पण, बिघाड दुरुस्त करून त्यांना पृथ्वीवर परत आणण्यासाठी नासाला तब्बल नऊ महिन्यांचा कालावधी लागला. स्पेसएक्सचे ड्रॅगन कॅप्सूल सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांच्यासह चार अंतराळवीरांना घेऊन फ्लोरिडा समुद्रात भारतीय प्रमाण वेळेनुसार बुधवारी पहाटे ३.५७ ला उतरले. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकापासून पृथ्वीपर्यंत अंतराळवीरांचा संपूर्ण प्रवास सुमारे १७ तासांचा होता. या प्रवासात एक क्षण असा आला की, नासाच्या शास्त्रज्ञांचे श्वास रोखले गेले होते. कॅप्सूलने पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताच त्याचे तापमान १६०० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त वाढले. नासाचा अंतराळयानाशी संपर्क तुटला. सात मिनिटांनी संपर्क पूर्ववत झाला. सात मिनिटांचा कालावधी सतरा तासांच्या प्रवासात खूप मोठा होता. दिनांक १ फेब्रुवारी २००३ रोजी नासाचे अंतराळयान 'कोलंबिया' याच स्थितीत अपघातग्रस्त झाले होते. पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताच ते कोसळले. ज्यामध्ये भारतीय वंशाच्या अंतराळवीर कल्पना चावला या बळी ठरल्या होत्या. याचा विचार करता सर्वांना दोघांची काळजी वाटत होती. दोघांना परत आणण्यासाठी नासाने स्पेसएक्स या खासगी अंतराळ संशोधन कंपनीच्या मदतीने मोहीम आखली होती. स्पेसएक्सच्या अवकाशयानाने १४ मार्च रोजी दोघांना परत आणण्यासाठी उड्डाण केले. भारतीय प्रमाणवेळेनुसार बुधवारी पहाटे ते यान दोन्ही अंतराळवीरांना घेऊन परतले. परतीचा प्रवास देखील सोपा नव्हता. परतीचा प्रवास अत्यंत नियोजित आणि तांत्रिकदृष्ट्या जटिल होता. त्यांनी १८ मार्च रोजी प्रवास सुरू केला आणि १९ मार्च रोजी ते पृथ्वीवर सुखरूपपणे उतरले तेव्हा जगभरात त्यांचे स्वागत करण्यात आले. आनंद व्यक्त करण्यात आला. त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. अडकून पडलेल्या कालावधीत सुनीता सर्वांना शुभेच्छाही देत होती. नववर्षाच्या शुभेच्छासुद्धा तिने तमाम पृथ्वीवासीयांना दिल्या होत्या. संशोधनासाठी माणसाला जेव्हा अंतराळात पाठवले जाते तेव्हा अशा प्रकारची आव्हाने निर्माण होऊ शकतात, याचा धडा या निमित्ताने सर्व अवकाश संस्थांना मिळाला आहे. अवकाशामध्ये स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी अंतराळवीरांना कोणती आव्हाने स्वीकारावी लागतात, याची माहिती या निमित्ताने समोर येणार आहे. सुनीता आणि विल्मोर यांना अवकाश मोहिमांचा मोठा अनुभव असल्यामुळे त्यांनी या संकटाचा सामना डगमगून न जाता केला. जेव्हा या दोघांचे दर्शन पृथ्वीवरील लोकांना झाले तेव्हा त्यांच्या चेहर्यावर निराशा किंवा काळजी दिसत नव्हती. अत्यंत आनंदी चेहर्याने ते सर्वांशी संवाद साधताना दिसत होते. दोघेही सुरक्षितपणे परत आले असले, तरी त्यांना पृथ्वीवरील नैसर्गिक वातावरणामध्ये स्वतःला जुळवून घेण्यासाठी त्यांना आणखी काही कालावधी लागेल. अंतराळवीर जेव्हा दीर्घकाळ अवकाशात राहतात तेव्हा त्यांच्या शरीरावर आणि मनावर अनेक प्रकारचे परिणाम होतात. रक्तातील पेशी, पचन संस्था, मुख्य म्हणजे मानसिकता याबाबत अनेक आव्हाने अंतराळवीरांसमोर उभी राहू शकतात, असे तज्ज्ञ सांगतात. अंतराळस्थानकात नेहमीसारखे पायांनी न चालता हवेत तरंगण्याची सवय असणार्या अंतराळवीरांना पृथ्वीवर आल्यावर पुन्हा एकदा नैसर्गिकरित्या चालण्याची सवय करून घ्यावी लागते. एवढेच नव्हे तर नैसर्गिक आहार आणि विहार या गोष्टींचीही सवय पुन्हा एकदा नव्याने करून घ्यावी लागते. पृथ्वीवरील सामान्य वातावरणाशी जुळवून घेतल्यानंतर त्यांचे नियमित जीवन सुरू होईल.

## विचारधन

### माणसाची हाव कायमच राहते



जगात दोन प्रकारचे रोग माणसाला सतावीत असतात. एक रोग असा की, त्याने भूकच लागत नाही. कितीही औषधपाणी करा, काही उपयोग होत नाही. अशा माणसाला पंचपक्वानाचे जेवण तयार असूनही काय फायदा? तो म्हणतो, खायला खूप आहे, परंतु मला भूकच नाही, त्याला काय करू? दुसरा रोग असा की, कितीही खाल्ले तरी खाण्याची हाव काही पुरी होत नाही. काहीही खा, त्याचे भस्म होते. तद्वत् आपले आहे. मात्र, आपल्याला एकच रोग नसून, दोन्ही रोग आहेत. इतका परमार्थाचा हाट भरला आहे, भजन-पूजन चालू आहे, परंतु आपल्याला त्याचे प्रेम नाही. त्याची आवडच वाटत नाही. आपल्याला त्याची खरी भूकच लागलेली नाही. उलटपक्षी, भगवंताने आपल्याला आपल्या कल्पनेपेक्षा खरोखर कितीतरी जास्त दिले? बायको, मुले, नोकरी-धंदा, घरदार इ. कितीतरी गोष्टी, की ज्यांपासून सुख मिळेल असे आपल्याला वाटते, त्या गोष्टी पुरविल्या; पण अजून आपली हाव या सर्वांना पुरून, या सर्वांचे भस्म करून, कायमच आहे, आणि परमेश्वराचे प्रेम मात्र काही लागत नाही. हे असे किती दिवस चालणार? आपण नीतिधर्माने चालतो, आपली वागणूक वाईट नाही, हे खरे. पण याचे कारण वाईट वागलो तर आपल्याला लोक नावे ठेवतील ही भीती! असा हा दिखाऊ चांगुलपणा, ही वरवरची सुधारणा काय कामाची? मानवी जीवन सुखी झाले तर ती सुधारणा म्हणायची! उलट आजची स्थिती पाहावी तर 'सुधारणा' जितक्या जास्त तितका माणूस जास्त असमाधानी झाला आहे. परमेश्वराचे प्रेम लागल्याशिवाय आणि इतर गोष्टींची हाव कमी झाल्याशिवाय काही फायदा नाही. तीर्थयात्रा, पूजा, भजन ही परमार्थाची नुसती आठवण देतील, पण अंतरंग सुधारेलच असे नाही आणि अंतरंग सुधारले नाही तर बाकीच्याचा उपयोग नाही. आपण दरवर्षी वारी करतो आणि जन्मभर वारी करीतच राहणार, परंतु परमेश्वराचे प्रेम मात्र काही लागत नाही. मनुष्याला किती असले म्हणजे पुरे होईल हे ठरलेले नाही; आहे त्या परिस्थितीत समाधान मानले की जे आहे ते पुरेल. परमार्थ 'समजून' जो त्याचे आचरण करील त्याला तो लवकर साधेल.

# लोहा तालुक्यातील विविध प्रमाणपत्र थेट व्हॉट्सॲप वरच मिळणार

## तहसीलदार विठ्ठल परळीकर यांची माहिती

**लोहा / प्रतिनिधी**



मुख्यमंत्र्यांचा शंभर दिवस अभियान महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी ई-ऑफिस करण्याचा निर्णय घेतला असून त्यादृष्टीने लोहा तहसील कार्यालयात तयारी सुरू आहे. याच उपक्रमाअंतर्गत तालुक्यातील सर्व नागरिक तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रमाणात व्हॉट्सॲपद्वारे मिळणार असून सेतू सुविधा केंद्र संचालकांना तसे निर्देश देण्यात येणार आहेत. त्यामुळे बाहेर गावी राहण्याची सोय होणार असून तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी हा उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी संपूर्ण कार्यालय ई-ऑफीस करण्यासाठी निर्देश दिले आहेत. त्यादृष्टीने तहसील व अन्य विभाग तयारी करत आहेत. मुख्यमंत्री यांचा १०० दिवसांचे अभियाना अंतर्गत तहसीलदार विठ्ठल परळीकर, व्हॉट्सॲपवर प्रमाणपत्र देण्याची सुविधा सुरू करण्याचा मानस व्यक्त केला. आपले सरकार-सेतू सुविधा केंद्र चालविणाऱ्याची लवकर बैठक घेतली जाणार आहे तर उत्पन्नाचा दाखला (मिळकतीचे प्रमाणपत्र,) जात (कास्ट सर्टिफिकेट) प्रमाणपत्र रहिवाशी प्रमाणपत्र, वय राष्ट्रीयत्व आणि अधिवास (रहिवासी) प्रमाणपत्र, अल्पभूधारक शेतकरी असल्याचे प्रमाणपत्र, पत दाखला, जात प्रमाणपत्र, डोंगरी असल्याचा दाखला, इत्यादी प्रमाणपत्र अर्जदारच्या व्हॉट्सॲपवर असा नवीन उपक्रम सुरू करण्यात येत आहे. अनेक विद्यार्थी ग्रामीण भागात राहतात. बाहेर गावी शिक्षण, कामधंदा, नोकरी व अन्य कारणास्तव गाव सोडूम बाहेर असतात. त्यांना मुद्दामहून प्रमाणपत्रसाठीच गावाकडे तहसील कार्यालयात ये-जा करावी लागते. सर्व ई-सेवा व आपले सरकार चालक यांनी अर्जदाराचा अर्ज घेतानांच व्हॉट्सॲप मोबाईल क्रमांक घ्यावा. प्रमाणपत्रास मान्यता मिळताच अर्जदाराच्या व्हॉट्सॲपवर पीडीप प्रमाणपत्र पाठवून द्यावे, अशी संकल्पना तहसीलदार विठ्ठल परळीकर यांची असून लवकरच याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होणार आहे.

# उमरी नगरपरिषदेने नव्याने विकसित केलेल्या २८ गाळ्यांचे आरक्षण जाहीर

**उमरी / प्रतिनिधी**



उमरी नगरपरिषदेने नव्याने विकसित केलेल्या २८ दुकान गाळ्यांचे आरक्षण जाहिर केले असून त्यात दिव्यांग, महिला बचतगट व अ.जा, अ.ज., वि.मा, भ.ज करीता आरक्षण काढण्यात आले आहे.

उमरी नगरपरिषद मार्फत मोंढा येथे सर्व्हे नं. १५५ मध्ये नव्याने विकसित केलेल्या २८ गाळ्यांकरीता गुरुवारी (दि.२०) उमरी नगरपरिषद कार्यालयात दिव्यांग, महिला बचतगट व अ.जा, अ.ज., वि.मा, भ.ज करीता मुख्याधिकारी निलम कांबळे यांनी उमरी शहरातील नागरिकांच्या उपस्थितीत लहान मुलाच्या हस्ते चिठ्ठी काढून गाळ्यांचे आरक्षण सोडत काढण्यात आले. त्यामध्ये दिव्यांगांकरिता, महिला बचत गटांकरिता व अ.जा, अ.ज., वि.मा, भ.ज या प्रवर्गाकरिता प्रत्येकी ५ टक्के आरक्षण याप्रमाणे दिव्यांगांसाठी गाळा क्र. १, महिला बचत गटांकरिता गाळा क्र. १३ तसेच अ.जा, अ.ज., वि.मा, भ.ज प्रवर्गाकरिता गाळा क्र.२६ आरक्षीत केले आहे. यावेळी मुख्याधिकारी निलम कांबळे, कार्यालयीन अधिक्षिका कांचन पडलवार, लेखापाल बालाजी चवरे, बांधकाम अभियंता कैलास यमलवाड, संगणक अभियंता विनोद सावंत, क.नि.अ. पिंडकुरवार, अभियंता विशाल बाराते, वरिष्ठ लिपीक गणेश मदने, सचिन गंगासागरे, अभियंता शकील खान पठाण, लिपीक सुर्यकांत माळवतकर, गंगाधर पवार, रमाबाई करपे, आकाश खंदारे, माधव जाधव, चंद्रप्रकाश मदने, शमीम बेग आदी नगरपरिषद अधिकारी, कर्मचाऱ्यांसह उमरी शहरातील दिव्यांग नागरिक, बचत गटांच्या महिला व्यापारी, नागरिक उपस्थित होते.

# जागतिक वनदिनी वाहनाच्या धडकेने हरिणाचा मृत्यू

**किनवट / प्रतिनिधी**

जागतिक वन दिनाच्या दिवशी पाण्यासाठी भटकंती करत असलेल्या हरिणाचा नांदेड-किनवट महामार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

हरिण खरब पठारापासून जवळ असलेल्या नारायण दंतलवाड यांच्या शेताजवळील नांदेड-किनवट राष्ट्रीय महामार्गावर ही घटना घडल्याची माहिती एका वनप्रेमींनी वन विभागास दिली. विशेषतः या हरीण पठारावर एक वनरक्षक एक वनमजूर यांची कायमस्वरूपी ड्युटी लावण्यात आलेली असताना या ठिकाणी वन विभागाचे कुठलेही कर्मचारी हजर राहत नसल्याने अशा घटना वारंवार घडत असताना पहावयास मिळतात. त्यातच या वन कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांची ड्युटी जवळपास रेल्वेच्या टाईम टेबलनुसार चालत असल्याचे विदारक चित्र नेहमी पहावयास मिळते. इस्लापूर ते किनवट राष्ट्रीय महामार्ग लगत असलेले हे हरीण खरब हरणासाठी सुप्रसिद्ध असून या हरीण खराबावर नीलगाय, रोही, काळवीट, कोल्हे, लांडगे, अशी विविध जातीचे हजारो वन्य प्राणी नेहमीच आढळतात. या हरीण खरबावर मोठ्या प्रमाणात हरणाचे कळप असून वनप्रेमी व पर्यटक देखील मोठ्या प्रमाणात हरीण पाहण्यासाठी येतात. सद्यस्थितीत ही वन्य प्राणी हरिण काळवीट हे त्यांच्या खाद्यासाठी व पाण्यासाठी वन वन भटकंती करताना दिसून येत आहेत. त्यामुळेच राष्ट्रीय महामार्ग ओलांडताना एका वाहनाच्या धडकेने जागतिक वन दिनी हरणाला जीव गमवावा लागला आहे. ही एक शोकांतिकाच म्हणावी लागेल. हरीण पठाराच्या काही अंतरावर वन विभागाने वाहने हळू चालवा असे फलक लावलेले आहेत. मात्र, राष्ट्रीय महामार्गावरून सुसाट धावणाऱ्या वाहनांच्या धडकेत वन्य प्राणी हरिण काळवीट अशा वन्य प्राण्यांना आपला जीव गमवावा लागत आहे. अज्ञात वाहनाच्या धडकेत हरिण या वन्य प्राण्याचा जीव गेल्याची माहिती वन विभागाला मिळाल्यानंतर वन विभागाने घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. पशुवैद्यकीय अधिकारी सोनटक्के यांनी शवविच्छेदन उत्तरीय तपासणी करून हरीण वन विभागाच्या ताब्यात दिल्याने वनविभागाने अत्यसंस्कार विधी पार पाडली. राष्ट्रीय महामार्गावर वन्य प्राण्यांच्या अशा घटना घडून नयेत यासाठी वन विभागाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वन प्रेमींकडून होत आहे

# अर्जापूर येथे वनदिन साजरा



**बिलोली :** वनपरिक्षेत्र बिलोली अंतर्गत जागतिक वन दिनानिमित्त शुक्रवारी (दि.२१) अर्जापूर येथे वृक्षदिंडी काढून विद्यार्थ्यांना वनभ्रमंती करण्यात आली. वृक्षदिंडीत सहभागी विद्यार्थ्यांना हुतात्मा पानसरे स्मारक परिसरात घनवन पध्दतीने लावलेल्या घनवन येथे आणून विद्यार्थ्यांना तेथे लावलेल्या विविध प्रकारच्या वृक्षांची ओळख करून देण्यात आली. तसेच, यावेळी उपस्थितांकडून वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास वनपरिक्षेत्राधिकारी डोंगरेस, वनपाल गुरुपवार, वनपाल शेख फरीद, वनरक्षक सय्यद फयाज, वनरक्षक मुसळे, वनरक्षक कोरडे, तसेच गावातील सरपंच, उपसरपंच, शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक आदी उपस्थित होते.

# भारत टॅलेंट सर्च परिक्षेमध्ये देगावच्या विद्यार्थ्यांचा घवघवीत यश

**मुक्रमाबाद / प्रतिनिधी**



नुकत्याच झालेल्या भारत टॅलेंट सर्च परीक्षा २०२५चा निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देगाव येथील एकूण २० विद्यार्थी परीक्षेत बसलेले होते. त्यापैकी १९ विद्यार्थ्या उत्तीर्ण झाले आहेत.

या निकालामध्ये विशेष म्हणजे यातील पाच विद्यार्थ्यांनी केंद्रातून प्रथम ,द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे. आणखीन एक महत्त्वपूर्ण बाब म्हणजे इयत्ता तिसरी वर्गातील अर्जुन गजानन गजले हा केंद्रातून दुसरा तर अर्जुन अरविंद गजेले हा केंद्रातून तिसरा आला आहे. तसेच इयत्ता तिसरीतील विद्यार्थ्यांनी देखील घवघवीत असे यश प्राप्त केले आहे. मुक्रमाबाद केंद्रातून पहिल्या टॉप १० मध्ये एकट्या देगाव शाळेचे इयत्ता तिसऱ्या वर्गातील एकूण आठ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. इयत्ता सहावीतील चामलवाड राजाराम प्रकाश यांनी केंद्रातून प्रथम क्रमांक मिळवला. इयत्ता आठवीतील गजले कृष्णा विठ्ठल यांनी केंद्रातून पहिला क्रमांक व बरले नारायण गंगाधर यांनी केंद्रातून दुसरा क्रमांक मिळवला आहे. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशामागे शिक्षकांचे अथाक परिश्रम यातून दिसून येतात. यामध्ये शाळेतील मुख्याध्यापक जाधव. जी.डी, शिक्षक कोकणे, कोंडे, डांगे, वडजे, कुलकर्णी, तसेच वंदना कळसकर (एमेकर) यांनी मेहनत घेतली. या यशासाठी गावातील सर्व नागरिक, सरपंच, शालेय समिती अध्यक्ष यांनी शाळेचे विद्यार्थ्यांचे व सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## उघड्यावर पडलेल्या कुटुंबासाठी रयत प्रतिष्ठान सरसावले

# वडिलांचे छत्र हरवल्यानंतर आईचेही अपघाताने निधन

**हदगाव / प्रतिनिधी**



वडिलांपाठोपाठ आईचेही अपघातात निधन झाल्यानंतर ओमकार आणि अलंकार ही दोन्ही पोरकी झाली. ते गावात आजोबांसोबत राहत आहेत. बिकट परिस्थितीत उदरनिर्वाह करत असलेल्या आजोबा आणि दोन्ही मुलांच्या मदतीसाठी रयत प्रतिष्ठान सरसावले आहेत.

तालुक्यातील सावरगाव माळ येथील ब्रम्हाजी कोंडबा शिरडे यांच्या कुटुंबात पत्नी एक मुलगी, दोन मुले असून मिळेल ते काम करून रोजमजुरीवर उदरनिर्वाह चालवत गेल्या वर्षी गावातील मुलाशी मुलीचा विवाह केला. विवाहानंतर काही दिवसाने वडील ब्रम्हाजीचे दुखद निधन झाले. वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी पडलेली आई रोजमजुरीवर उदरनिर्वाह चालवत असताना आठ दिवसांपूर्वीच अर्धापूरजवळ समोरून भरधाव वेगातील वाहनाच्या धडकेत आईचे निधन झाले. आई-वडिलांचे दोघांचे छत्र हरवल्यानंतर ओमकार वर्ग नववा तर अलंकार वर्ग आठवा हे अनाथ झाले. घर उघड्यावर पडल्याने गावातच राहत असलेले आईचे वडील साहेबराव सिताराम गारुडे यांच्याकडे दोन्ही अनाथ भांवडे राहत असून त्यांचीही परिस्थिती अंत्यत बेताची असून रोजमजुरीवर उदरनिर्वाह चालवतात. आपण कल्पनाही करु शकणार नाही. अशा परिस्थितीची माहिती प्रसार माध्यमातून प्रकाशित झाल्याने गेल्या काही वर्षांपासून सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या सटवाजी पवार जवळगांवकर, ईस्माईल पिंजारी चिंचगव्हाण, सविता निमडगे पळसेकर, प्रभाकर दहिभाते बरडशेवाळेकर यांनी सावरगांव येथे कुटुंबाची सांत्वन भेट घेत या अनाथ भावंडच्या मदतीसाठी रयत प्रतिष्ठान अध्यक्ष सटवाजी पवार जवळगावकर यांनी पुढाकार घेत या कुटुंबाची जबाबदारी स्विकारुन नेहमीप्रमाणे आपल्या फोन पे नंबर -९४२०९२९५९७ वरुन केलेल्या आवाहनाला प्रतिसाद मिळत असून दानशूर व्यक्तीने मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले आहे.

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह)
'गांवकरी प्रकाशन'च्या मालकीचे हे दैनिक छत्रपती संभाजीनगर आवृत्तीचे परवानाधारक आय.ए. व्हिजन प्रा.लि. यांचे वतीने कैलास टॉवर्स, प्लॉट क्र.१,सौजन्यनगर, काल्डा कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ येथून प्रकाशित करण्यात आले.
**कार्यकारी संपादक :** दिनेश राधाकृष्ण हारे※ (※पीआरबी कायद्याप्रमाणे प्रकाशित मजकूरास जबाबदार) **प्रकाशक :** दिनेश हारे
**मुद्रक :** कुलभुषणराम तारे, (सोलापूर तरूण भारत मीडिया लि.,) प्लॉट नं. ए-३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को. ऑप. सो., रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ (महाराष्ट्र)

## संक्षिप्त बातम्या



### नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी कावली मेघना यांचा सत्कार

**नांदेड :** जिल्हा परिषद नांदेडच्या नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली मॅडम यांचे महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन जिल्हा शाखा नांदेड यांचे वतीने स्वागत करून शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच संपूर्ण सहकार्याचे आश्वासन देण्यात आले. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली मॅडम यांनी संघटनेचे आभार मानत कर्मचाऱ्यांना उद्देशून आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी कर्मचारी युनियनचे राज्य कार्याध्यक्ष बाबुराव पुजरवाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, जिल्हाध्यक्ष धनंजय गुम्मलवार, सचिव राघवेंद्र मदनूरकर, कोषाध्यक्ष सचिन चौदंते, केंद्रीय कार्यकारणी सदस्य पवन तलवारे, प्रल्हाद थोरवटे, वाहन चालक संघटनेचे अध्यक्ष गणेश अंबेकर,अशोक मोकले, संतोष मठपती,नितीन पाम्पटवार, रामदास शेकापुरे, उमाकांत हाळे, गोविंद गट्टूवार, बालाजी महाजन, सुदर्शन मस्के, अल्केश शिरसेटवार,महेश लोणीकर, मुक्तेश्वर चिवडे, गोविंद रासोदे शेख मुजाहिद रामेश्वर बेळगे सिद्धार्थ पवळे दिनेश नेऊलकर सुमित पेटकर शेख जाफर किशोर खिल्लारे महादेव फजई राजरत्न ढोले आबाजी डाके हरी वडजे राजकुमार बाचोरे,जितेंद्र तोटलवाड, बासनुरे, गोविंद गज्जेवार,सौ छाया कांबळे, एस एस शिंपाळे, सौ सुंकवाड, श्रीमती इंदुमती वाघमारे, प्रेमला चौदंते, बलजीत कौर चव्हाण, श्रीमती राधाबाई सर्जे,मीनल देशमुख, विद्या लोणे, बागवाले मॅडम, अवातिरक मॅडम,कल्याण मॅडम, कुंटे , स्वरूपा फुलारी, राऊत, कल्याणकर मॅडम यांच्यासहित मुख्यालयातील मोठ्या प्रमाणात कर्मचारी वृंद उपस्थित होते.

### मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांची जिल्हा परिषदेच्या विभागांना भेट

**नांदेड :** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी आज जिल्हा परिषदेतील सर्व विभागांना भेटी देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी विभाग प्रमुख व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत प्रशासन अधिक कार्यक्षम व सुव्यवस्थित करण्याच्या सूचना दिल्या. याप्रसंगी सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक बालाजी नागमवाड यांची उपस्थिती होती. मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी कार्यालयातील स्वच्छता, सिक्स बंडल पद्धतीने फाईल्स व रेकॉर्ड ठेवणे तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याने आपला जॉब चार्ट लावावा यामुळे जिल्हा परिषदेचे कामकाज अधिक प्रभावी व पारदर्शक होईल असे त्यांनी सांगितले.

### वृक्षतोडीवरील मूक नाटिकेने गहिवरले शिक्षक आणि विद्यार्थी

**नांदेड :** जागतिक वन दिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी 'माझे झाड माझा जीव' ही मूक नाटिका सादर केली. कुठलाही मंच अथवा कोणताही रंगमंच उपलब्ध नसताना शाळा परिसरातील झाडांमध्ये सादर केलेल्या मूक नाटिकेमुळे उपस्थित शिक्षक आणि विद्यार्थी गहिवरले. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशनराव गच्चे, माता पालक संघाच्या अध्यक्षा मनीषा गच्चे, सरपंच प्रतिनिधी साहेबराव शिखरे, माजी सरपंच कैलास गोडबोले, आनंद गोडबोले, हरिदास पांचाळ, पांडूरंग गच्चे, कमलताई गच्चे, अमोल शिखरे, मंचक पाटील, मारोती चक्रधर, हैदर शेख आदींची उपस्थिती होती. जागतिक वन दिवस हा दरवर्षी २१ मार्चला साजरा करण्यात येतो. संयुक्त राष्ट्र संघाने २८ नोव्हेंबर २०१२ ला जागतिक वन दिवस साजरा करण्याचा ठराव मंजुर केला. २१ मार्च २०१३ रोजी प्रथमच आंतरराष्ट्रीय वन दिन साजरा करण्यात आला. वनांचा मानवी जिवनाशी असलेला सरळ संबंध, जंगलावर अवलंबून असणारी प्राचीन औषध प्रणाली आणि सोबतच जंगलावर आपली उपजीविका भागवणाऱ्या जमाती आणि जैवविविधता याबाबत लोकांमध्ये जागरुकता पसरवण्यासाठी आणि जंगल निर्माण, संवर्धन आणि संरक्षणाच्या उद्देशांसाठी संयुक्त राष्ट्र संघाने २०१२ पासून २१ मार्च हा दिवस जागतिक वन दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवले.

# जिल्ह्यात राष्ट्रवादीची दमदार वाटचाल ; गुलाबी वातावरणात दादांचा उद्या प्रवेश

**विशेष प्रतिनिधी**

नांदेड-गेल्या दोन महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जवळपास अडीच ते तीन हजार पदाधिकाऱ्यांनी पक्ष प्रवेश केला आहे. येत्या रविवारी माजी मंत्री भास्करराव पाटील खतगांवकर, डॉ. मिनल पाटील खतगांवकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांच्यासह त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीचे नेते ना.अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थित नरसी येथील भव्य मेळाव्यात पक्ष प्रवेश करणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसने मुस्लीम बहुल असलेल्या देगलूर नाका परिसरात राजकीय ऍन्ट्री मारली असून अनेक माजी नगरसेवक रविवारी राष्ट्रवादीत पक्ष प्रवेश करीत आहेत.

राज्यात प्रचंड बहुमत प्राप्त करुन सत्तेत आलेले महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते ना.अजितदादा पवार हे येत्या रविवारी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्यासोबत माजी मंत्री नवाब मलीक हेही सोबत आहेत. सध्या पवित्र रमजान महिना सुरु आहे. ना.अजितदादांच्या आगमनानिमित्त शहरातील मुस्लीम बांधवांनी मालटेकडी येथील हैदरबाग फंक्सन हॉल येथे इफ्तार पार्टीचे आयोजन केले आहे. या इफ्तार पार्टीला राष्ट्रवादीचे नेते ना.अजितदादा पवार हे जातीने उपस्थित राहणार आहेत. या इफ्तार पार्टीत किमान तीन हजार मुस्लीम समाजाचा जनसमुदाय उपस्थित राहिल अशी व्यवस्था आयोजक समितीने केली आहे.

नरसी येथे आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात मोठे शक्तीप्रदर्शन खतगांवकर समर्थकांच्यावतीने करण्यात येणार आहे. मेळाव्याची जय्यत तयारी सुरु झाली असून नरसी, नायगांव पासून ते नांदेड शहरापर्यंत गुलाबी रंगाचे स्वागताचे बॅनर झळकत असल्यामुळे या कार्यक्रमाची चर्चा सर्वदूर होत आहे. नांदेड शहरातही खतगांवकरांचे बॅनर चौका-चौकात लावण्यात आले आहेत. इफ्तार पार्टीच्या बॅनरने देगलूर नाका परिसरात गुलाबी वातावरण निर्माण झाले आहे. ना.अजितदादा पवार यांचे मोठ्या उत्साहात मुस्लीम समाजाकडून जोरदार स्वागताची तयारी अंतीम टप्प्यात आली आहे.

काँग्रेस पक्षाची ओट बँक असलेला मुस्लीम समाज आता हळूहळू अजितदादा यांच्या राष्ट्रवादीकडे वळू लागला आहे. काँग्रेसच्या ओट बँकेला सुरुंग लावण्यात राष्ट्रवादीचे नेते आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांना यश आले आहे. ना.अजितदादांच्या प्रमुख उपस्थितीत मुस्लीम समाजाचे बरेच माजी नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. आ.चिखलीकर यांची मुस्लीम समाजासोबत जवळीक यापूर्वीही होती. आ.चिखलीकर हे भाजपात दाखल झाल्यामुळे मुस्लीम समाजाची पंचाईत झाली होती. वैयक्तीक चिखलीकरांवर मुस्लीम समाजातील जनता प्रेम करतात पण त्यांना भाजपा चालत नसल्यामुळे चिखलीकर व मुस्लीम पदाधिकाऱ्यांची राजकीय अडचण निर्माण झाली होती. आ.चिखलीकर हे आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आल्यामुळे निर्माण झालेली ही दरी आता पूर्णपणे दूर झाल्यामुळे मुस्लीम समाजाचा ओढा राष्ट्रवादी काँग्रेसकडे वाढला आहे.

आगामी काळात नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात हिंदू,मुस्लीम,बौध्द समाजासह इतर समाजाला सोबत घेवून चालणारे नेतृत्व म्हणून आ.चिखलीकर यांच्याकडे पाहिले जाते. येत्या रविवारी राष्ट्रवादीत प्रवेश करणारे माजी खा.भास्करराव पाटील खतगांवकर यांना मानणारा मुस्लीम समाजाचा वर्ग मोठा आहे. खतगांवकर-चिखलीकर या जोडगोळीने आगामी काळात काँग्रेसह भाजपाची मोठी डोकेदूखी ठरतील असा राजकीय निरीक्षकांचा अंदाज आहे. अवघ्या दोन महिन्यात जवळपास तीन हजार पदाधिकाऱ्यांच्या पक्ष प्रवेश झाला आहे. आगामी काळात असा वेग राष्ट्रवादीत वाढत गेल्यास जिल्ह्यात नंबर एकचा पक्ष म्हणून उदयास येवू शकते असे राजकीय तर्कवितर्क लढविले जात आहेत. नांदेड जिल्ह्यात सध्यातरी पक्षप्रवेश सोहळे घेण्यात राष्ट्रवादी आघाडीवर आहे. भाजपातील अंतर्गत कुरघोडीच्या राजकारणामुळे पदाधिकाऱ्यांची कुचंबना होत असल्याचे बोलले जात आहे.







### 'दादां' चा प्रवेश ; गुलाबी वातावरण!

**शिंदे सेना** की राष्ट्रवादी अशा व्दिधा मनस्थित असलेले भास्करराव पाटील खतगांवकर यांनी अखेर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय जाहिर केला. येत्या रविवारी मोठे शक्तीप्रदर्शन करीत खतगांवकरांचा प्रवेश होणार आहे. मेळाव्याच्या तयारीसाठी गुलाबी रंगाचे बॅनर नरसी-नायगांवपपासून ते नांदेडपर्यंत लावण्यात आले आहेत. दादांच्या भव्य-दिव्य पक्ष प्रवेशाची चर्चा सर्व दूर होत आहे. नांदेड शहरासह ग्रामीण भागात राष्ट्रवादीच्या गुलाबी बॅनरबाजीमुळे गुलाबी वातावरण निर्माण झाले आहे. अशा गुलाबी वातावरणात भास्कर दादांचा प्रवेश सोहळा होत आहे हे विशेष!

### देगलूर नाक्यात राष्ट्रवादीची एन्ट्री!

**काँग्रेसचा बालेकिल्ला** म्हणून ओळखला जाणारा मुस्लीम बहुल देगलूर नाक्यात ना.अजितदादा यांच्या राष्ट्रवादीने जोरदार मुसंडी मारली आहे. ना.अजितदादा यांच्या उपस्थितीत मुस्लीम समाजाचे अनेक माजी नगरसेवक व प्रतिष्ठीत नागरीक राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. राष्ट्रवादीच्या एन्ट्रीमुळे काँग्रेसच्या गडाला सुरुंग लावण्यात राष्ट्रवादीचे नेते आ.चिखलीकर यांना यश आले आहे. मुस्लीम समाजाबरोबरच कांही दलित समाजातील पदाधिकाऱ्यांचाही पक्ष प्रवेश होणार असल्याचे खात्रीलायक वृत्त हाती आले आहे.

# पोलीस अंमलदाराच्या हाताला माकडाने घेतला चावा

**नांदेड /प्रतिनिधी**

पोलीस उपमहानिरिक्षक कार्यालयातर्फे सुरू असलेल्या वार्षिक तपासणी अहवालातील कवायतीसाठी (परेड) करतांना आज सकाळी एका पोलीस अंमलदाराच्या डाव्या हाताला माकडाने चावा घेतला. सध्या त्यांच्यावर शासकीय रुग्णालयातील विशेष दक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे वैद्यकीय सुत्रांनी सांगितले.

नांदेड जिल्हा पोलीस दलाची तपासणी सुरू आहे. तपासणी दरम्यान सर्वात शेवटी कवायत आणि नोटस लिहिले जातात. कवायत चांगली व्हावी म्हणून त्यासाठी पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार, महिला पोलीस अंमलदार हे बरेच दिवस सराव करतात. आज २१ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजेच्यासुमारास पोलीस मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज परेड ग्राऊंडवर सराव सुरू होता. या दरम्यान अचानकच एका माकडाने ग्राऊंडमध्ये उडी घेतली आणि सराव करणारे पोलीस अंमलदार माधव भगवान पवार बकल नंबर २९९२ यांच्या डाव्या हाताला चावा घेतला. माकडाने घेतलेला चावा मोठाच होता. जवळपास ३ ते ४ इंचाची जखम झाली आहे. त्वरीत राखीव पोलीस निरिक्षक विजय धोंडगे यांनी जखमी झालेल्या माधव पवार यांना उपचारासाठी विष्णुपूरी येथे पाठविले. सध्या त्यांच्यावर रुग्णालयाच्या विशेष दक्षता विभागातील कक्ष क्रमांक १५ मध्ये उपचार सुरू आहे. त्यांची देखरेख करण्यासाठी पोलीस शिपाई बालाजी सोनटक्के यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोलीस उपअधिक्षक डॉ. अश्विनी जगताप यांनी दवाखान्यात भेट देवून जखमी झालेल्या पोलीस अंमलदाराची विचारपुस केली आहे.



# 'भाऊराव चव्हाण'चे चेअरमन गणपतराव तिडके यांचा राजीनामा

**नांदेड / प्रतिनिधी**



मागील काही वर्षांपासून कारखाना अंतर्गत आणि बाह्य कटकटींना निमूटपणे तोंड देत भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्षपद सांभाळणारे गणपतराव श्यामराव तिडके यांनी गुरुवारी आपल्या पदाचा राजीनामा कारखान्याच्या उपाध्यक्षांकडे सादर केला. या माहितीला साखर सह संचालक कार्यालयाकडून दुजोरा मिळाला आहे.

काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री आणि आता भाजपामध्ये असलेले खासदार अशोक चव्हाण यांचे नेतृत्व आणि मार्गदर्शन लाभलेल्या वरील कारखान्यात मागील अनेक वर्षांपासून गणपतराव तिडके हे अध्यक्षपद भूषवत होते. गुरूवारी त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याची माहिती कारखाना प्रशासनातून बाहेर आली आणि मग वेगवेगळ्या माध्यमातून संपूर्ण कार्यक्षेत्रात पसरली. या पार्श्वभूमीवर चौकशी केली असता प्रकृती साथ देत नसल्यामुळे प्रशासकीय कामकाजात भाग घेता येत नाही, असे कारण नमूद करून त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा कारखान्याचे उपाध्यक्ष नरेन्द्र चव्हाण यांच्याकडे सुपूर्द केल्याचे स्पष्ट झाले. राजीनामा पत्राची प्रत राज्याचे साखर आयुक्त, प्रादेशिक सह संचालक (साखर कार्यालय) आणि अशोक चव्हाण यांना इ-माध्यमाद्वारे पाठविण्यात आलेली आहे.१९९०च्या दशकात अर्धापूर तालुक्यातील देगाव-येळेगाव परिसरात भाऊराव चव्हाण कारखान्याची स्थापना झाली. नंतर या कारखान्याचे अध्यक्षपद निवृत्त पोलीस अधिकारी मोहनराव पाटील यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यांच्यानंतर अध्यक्षपदाची धुरा गणपतराव तिडके यांच्याकडे आली. पंधरा वर्षांहून अधिक काळ त्यांनी कारखान्याचे अध्यक्षपद सांभाळले.भाऊराव चव्हाण कारखान्याने आपल्या मूळ प्रकल्पाच्या माध्यमातून डोंगरकडा कारखान्यासह वाघलवाडा येथील शंकर आणि हदगाव येथील हुतात्मा जयंतराव पाटील असे तीन कारखाने तिडके यांच्या अध्यक्षपदाच्या काळात खरेदी केले. पण चार कारखान्यांचा भार पेलता पेलता अनेक अडचणी उद्भवल्यानंतर मधल्या काळात दोन कारखान्यांची विक्री करण्यात आली. या सबंध काळात तिडके यांना कारखान्याअंतर्गत बऱ्याच कटकटींना तोंड द्यावे लागले. पण आपल्या शांत स्वभावाला साजेल अशा पद्धतीने त्यांनी आतापर्यंत अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली. भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याच्या कारभारावर मागील काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर टीका झाली. शेतकरी नेत्यांकडून कारखान्यावर वेगवेगळे आरोप करण्यात आले. एफआरपीच्या मुद्यावर अर्धापूर तालुक्यातील प्रल्हाद इंगोले व इतर कार्यकर्त्यांनी भाऊराव चव्हाणच्या प्रशासनाला न्यायालयामध्येही खेचले होते. अनेक प्रकरणे आजही न्यायालयात प्रलंबित आहेत.

मधल्या काळात कारखान्याच्या नेतृत्वाने प्रशासनामध्ये लातूर जिल्ह्यातील एका अधिकाऱ्याला आणून गणपतराव तिडके यांची कोंडी केली होती. वरील अधिकाऱ्याच्या कारकिर्दीत तिडके हे केवळ नामधारी अध्यक्ष बनले होते. पण त्याबद्दल कोठेही वाच्यता न करता त्यांनी निर्माण झालेल्या परिस्थितीला शांतपणे तोंड दिले. काही वर्षांपूर्वी त्यांना एका विकाराने ग्रासले, तरी अवघड स्थितीतही त्यांनी कारखान्याचा कारभार रेटून नेला. पण आता त्यांनी जबाबदारीतून मुक्त होण्याचा निर्णय घेतला असून त्यांच्या राजीनाम्याचे वृत्त बाहेर येताच समाजमाध्यमांमध्ये त्यावर चर्चा सुरू झाली.

# रा.यु.काँग्रेसच्या जिल्हा अध्यक्षपदी बालाजी नागणीकर यांची निवड

**नांदेड/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्षपदी धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते बालाजी पांडुरंग पाटील शिंदे नागणीकर यांची निवड झाल्याचे पत्र प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांच्या स्वाक्षरीने नुकतेच पत्र आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते बहाल करण्यात आले त्यांच्या या निवडीबद्दल बिलोली तालुक्यासह जिल्हास्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.




नागणी येथील युवा कार्यकर्ते बालाजी पाटील यांचा दांडगा संपर्क पाहता व परिसरातील राजकीय सामाजिक क्षेत्राशी नाळ जोडल्या गेलेले एक वजनदार युवा कार्यकर्ते म्हणून बालाजी पाटील यांना ओळखले जातात या बाबीचा विचार करून पाटील यांचा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पक्षाला होणारा फायदा लक्षात घेऊन त्यांची व राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या आदेशान्वये राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या नांदेड दक्षिण जिल्हा अध्यक्षपदी बालाजी पाटील नागणीकर यांची निवड झाल्याचे नियुक्तीपत्र बहाल करण्यात आले त्यांच्या या निवडीबद्दल बिलोली तालुक्यासह नांदेड जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदन चा वर्षाव होत आहे.यात आ.प्रताप पाटील चिखलीकर,मोहन अण्णा हंबर्डे, जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, नागनाथ पाटील सावळीकर, रणजीत पाटील हिवराळे यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले आहे. तर नियुक्तीपत्र आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते प्रधान करण्यात आले यावेळी माधव पावडे, माजी आमदार अविनाश घाटे, दिलीपराव धर्माधिकारी, वसंत पा.सुगावे, बाळासाहेब पाटील रावणगावकर, नेताजी दादा भोसले, साहेबरावजी धनगे, पप्पू भाऊ जाधव, कन्हैया पाटील कदम, मोहसीन खान पठाण, योगेश पाटील शिंदे,स्वप्निल इंगळे, अतुल हिमगिरे, विलास पाटील सूर्यवंशी, ज्ञानेश्वर पाटील नरवाडे, यांच्यासह राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# उपक्रमशील शिक्षक रवी ढगे यांची आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यासाठी निवड

**नांदेड/प्रतिनिधी**

शिक्षण क्षेत्रात आपल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांनी विद्यार्थ्यांना नवे दृष्टीकोन देणारे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा मारतळा तालुका लोहा येथील मुख्याध्यापक तथा उपक्रमशील शिक्षक रवी ढगे यांची महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या स्टार्स प्रकल्पांतर्गत सिंगापूर आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे.

शिक्षण क्षेत्रात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान मिळाला आहे. कोरोना काळात घरचा अभ्यास हा स्तुत्य उपक्रम राबवून त्यांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. तसेच, शाळाबाह्य मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी बालरक्षक म्हणून भरीव योगदान दिले. तंबाखूमुक्त शाळा अभियानात त्यांनी शाळा व कुटुंबांमध्ये जागरूकता निर्माण करून सकारात्मक बदल घडवला. विद्यार्थ्यांसाठी भविष्यवेधी शिक्षणाच्या दृष्टीने लर्निंग टू लर्न उपक्रमाअंतर्गत त्यांनी जपानी व जर्मन भाषा शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली. दिवाळीच्या सुट्टीचा उपयोग करत चला इंग्रजी वाचूया-लिहूया उपक्रम राबवला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर वृक्ष वाचनालय २०२३ पासून नियमित सुरू ठेवत विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजवली. शालेय जीवनात भारत स्काऊट-गाईड पथकाची स्थापना करून जिल्हास्तरावर विविध पुरस्कार मिळवले. हरित शाळा, तंबाखूमुक्त शाळा, प्लास्टिकमुक्त शाळा या संकल्पनांद्वारे शाळेला एक वेगळी ओळख मिळवून दिली. राष्ट्रीय बाल परिषदेमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग निश्चित करून त्यांचे नेतृत्वगुण विकसित केले.

## आयुक्त, प्रशासक डॉ.महेश डोईफोडे यांची माहिती

# महानगरपालिकेचा १५०५ कोटीचा अर्थसंकल्प जाहीर

**नांदेड/प्रतिनिधी**

नागरिकांवर कोणत्याही प्रकारची कर वाढ न करता उत्पन्न वाढीचे विविध उपाय आणि खर्चातील बचत यामुळे नागरिकांसाठीच्या सोयी सुविधांवर कोणताही परिणाम होणार नाही. अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये समाविष्ट केलेली ध्येय समोर ठेवून महापालिकेचा सुधारित अर्थसंकल्प एक हजार पाचशे पाच कोटींचा असल्याचे त्यांनी जाहीर केले.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प घोषित करण्यासाठी एक सभा आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी प्रशासक डॉक्टर महेश कुमार डोईफोडे माहिती देत होते. डोईफोडे पुढे म्हणाले की, पाणीपुरवठा मल जलनिसारण या विभागाकरिता या वर्षात एकूण ६२ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. शहरातील नागरिकांना वाहतूक शिस्त लागावी व वाहतिक कोंडी वाढू नये यासाठी शहरातील मुख्य रस्त्यावरील कैलासवासी व्यंकटराव तरोडेकर चौक, वर्कशॉप कॉर्नर, महात्मा फुले पुतळा चौक, अण्णाभाऊ साठे चौक यासारख्या प्रमुख सात चौकामध्ये फ्री लेफ्ट साठी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. संविधानाच्या ७५ व्या वर्षानिमित्त संविधान भवन उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला असून संविधान भवन उभारण्यासाठी १५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. डिजिटल लायब्ररी उभारण्यासाठी पाच कोटीची तरतूद करण्यात आली आहे. किवळा तलावा जवळील महापालिकेच्या दहा एकर जागेवर थीम पार्क वॉटर स्पोर्ट्स आणि अम्युजमेंट पार्क उभारणीसाठी पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महापालिका शाळा कॉलेज कोचिंग क्लासेस बाजारपेठ यासारख्या गर्दीच्या ठिकाणी महिला व मुलींसाठी स्वतंत्र शौचालय ची व्यवस्था करणार आहे. बांधकाम व अन्य विभागाच्या सर्व प्रकारच्या बाबींसह इतर भांडवली कामाकरिता १४१.७१ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. सिडको हडको भागातील साई -मंगल कार्यालयाच्या नूतनीकरणासह क्रीडा संकुल उभारण्यासाठी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून स्टेडियम परिसरात क्रिकेट प्रबोधिनी सुरू करण्यात येणार आहे व महिला खेळाडूंसाठी स्वतंत्र प्रशिक्षकाची व्यवस्था करण्यात येणार असून त्यासाठी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र उद्यान विकसित करण्यात येणार असून त्यासाठी दोन कोटी ५० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. माता गुजरी जी विसावा उद्यान नूतनीकरणा करिता दहा कोटींची तरतूद करण्यात आली असून त्या उद्यानात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकासाठी सुद्धा दहा कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. नांदेड शहराच्या प्रवेश मार्गावर स्वागत कमान उभारण्यासाठी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीमधून शहरात एकूण एकूण ठिकाणी नवीन दवाखालील सुरू करण्यात येणार असून महापालिकेतर्फे चालविण्यात येणाऱ्या हैदराबाद दवाखाना आणि शिवाजीनगर येथील दवाखान्याच्या बाह्य रुग्ण विभागातील सर्व तपासण्या चालू वर्षापासून निश्चित निशुल्क करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महानगरपालिकेच्या मल जलशुद्धीकरण आणि जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या मोकळ्या जागांवर वीस मेगा वॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प उभा करण्यात येणार आहे. महापालिकेच्या मुख्य इमारतीवर ६५ केबी चा ऊर्जा प्रकल्प सन २०२४ २५ मध्ये उभारण्यात आला असून विद्युत देयक यात प्रतिवर्षी ३० लाख रुपयांची बचत होत आहे. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे महापालिकेतील पात्र सदोतीस वारसदारांना ३७ वारसदारांना लाड- पागे समितीच्या शिफारशीनुसार पालिका सेवेत नियुक्ती देण्यात आली आहे. या या अर्थसंकल्पीय सभेला उपायुक्त अजित पवार सिंग संधू अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम व लेखाधिकारी जनार्दन पकवांनी यांच्यासह अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

छायाचित्र नरेंद्र गडप्पा



# विजांचा कडकडाट, वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस

## पिकांसह फळबागांचे नुकसान, वीज पडून बैल ठार

**उमरगा/प्रतिनिधी**

शहरासह तालुक्यात गुरूवारी सायंकाळी विजेच्या कडकडाटासह झालेल्या वादळी वाऱ्यात जोरदार पाऊस झाला. यात फळबागांचे मोठे नुकसान झाले. तर उन्हाळी पिकांसह भाजीपाला वर्गीय पिकांना मोठा फटका बसला असून चिंचोली जहागीर येथील तुकाराम माने यांच्या बैलावर वीज पडल्याने बैल जागीच ठार झाला. ऐन पेरणीपूर्व मशागतीत ही दुर्घटना घडल्याने शेतकऱ्यावर आर्थिक संकट कोसळले आहे.

या वादळी पावसाने आंबा, भाजीपाला व उन्हाळी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या पावसाचा भाजीपाल्याला मोठा फटका बसल्याने भाजीपाल्याचे भाव आता गगनाला भिडणार आहेत. तर आंबा पिकाला पावसाचा मार लागल्याने आंबा पिकाची प्रतवारी खराब होऊन बागायतदार शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसणार आहे. गुरुवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसात विज गायब झाली होती. रात्री अचानक आकाशात काळे ढग जमले व विजांच्या



कडकडाटसह तुफान पाऊस सुरु झाला.

तालुक्यातील चिंचोली जहागीर येथील शेतकरी तुकाराम माने यांनी आपली बैलजोडी शेतात बांधली होती. अचानक विजेच्या कडाकडाटासह आलेल्या वादळी पावसात वीज पडल्याने त्यांच्या बैलजोडीतील एक बैल जागेवर ठार झाला आहे. मोठ्या कष्टाने बैल बारदाना उभा केला, त्यातच पेरणीपूर्व मशागत सुरू असताना वीज पडून सुमारे १ लाख किमतीचा बैल दगावल्याने शेतकरी उघड्यावर आला आहे. प्रशासनाने तत्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी आपदग्रस्त शेतकरी तुकाराम माने यांनी केली आहे.

# एका वर्षात ४ हजार २०० न्यायीक प्रकरणांचा निपटारा

## लातूर धर्मादाय सहआयुक्त कार्यालयाची कामगिरी

**लातूर/प्रतिनिधी**

धर्मादायसह आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर या कार्यालयाने सन २०२४ या वर्षामध्ये धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्देशानुसार वेळोवेळी विशेष मोहिमा राबवून लातूर जिल्ह्यातील विविध सार्वजनिक न्यासाचे बदल अर्ज, नवीन न्यास नोंदणीची प्रकरणे व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या विविध कलमान्वये दाखल प्रकरणांचा निपटारा करुन सन २०२४ मध्ये एकूण ४ हजार २०० न्यायीक प्रकरणे निकाली काढली आहेत. त्याच प्रमाणे अशा प्रकरणांच्या निकालांच्या प्रती संकेतस्थळावर उपलब्ध केल्या आहेत.

नवीन संस्था नोंदणी व न्याय नोंदणीची प्रकरणे संकेतस्थळावर ऑनलाईन दाखल करण्याची सुविधा उपलब्ध केली असल्याने नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यावर नोंदणी प्रमाणपत्रे डिजीटल स्वाक्षरीने उपलब्ध करण्याची सोय उपलब्ध केली आहे. विश्वस्त संस्थांना दाखल करावे लागणारे लेखा परिक्षण अहवाल संकेतस्थळावर ऑनलाईन दाखल करण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे संस्था व न्यास नोंदणीकरिता, तसेच लेखा परिक्षण अहवाल दाखल करण्याकरिता पक्षकारांना कार्यालयात येण्याची आवश्यकता भासत नाही.

सन २०२४ मध्ये धर्मादाय आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाने १८९ नवीन संस्था नोंदणीची प्रकरणे निकाली काढली आहेत. न्यास नोंदणी प्रक्रियेत, तसेच बदल अर्जाच्या न्यायीक प्रक्रियेत निकालाकरिता होणारा विलंब टाळण्याकरिता प्रकरणे दाखल करण्याच्या टप्प्यावर त्यांची तपासणी करुन त्यातील त्रुटी दूर करुन अशी प्रकरणे लवकरात लवकर निकाली करण्याची कार्यवाही केली जात आहे. अवादातीत बदल अर्जाकरिता विशेष मोहिम राबवून अशी प्रकरणे जास्तीत जास्त संख्येने निकाली केली जात आहेत. संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या नोंदणी प्रक्रियेचा व निकाली प्रकरणांच्या आदेश उपलब्ध केलेल्या सुविधेचा पक्षकारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन धर्मादाय उपायुक्त एस. व्ही. एच. कादरी लातूर यांनी केले आहे.



## शेख शहाबोद्दीन सार्वरदिया फाउंडेशनतर्फे इफ्तार पार्टीचे आयोजन

**वलांडी/प्रतिनिधी**

इस्लाम धर्माचा पवित्र रमजान महिना सुरू असून, रोजेदार दिवसभर उपवास ठेवून इफ्तारच्या वेळी प्रार्थनेसाठी एकत्र येतात. याच पार्श्वभूमीवर शेख शहाबोद्दीन सार्वरदिया फाउंडेशनच्यावतीने वलांडीत भव्य इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

रमजान महिन्यात मुस्लिम बांधव पहाटे सहेरी करतात, पाच वेळा नमाज अदा करतात आणि दिवसभर उपवास ठेवतात. दिवसभर उपवासानंतर सायंकाळी ६.४२ वाजता खजूर व पाण्याने रोजा सोडला जातो. यावेळी समाजातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत अनेकांनी या इफ्तार पार्टीत सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे आयोजन खदिर कादरी, समीर शेख, सोहेल अंबुलगे, याकूब शेख, निहाल शेख, अर्षद बागवान, सोहेल शेख, वसीम कादरी, साहिल शेख, कैफ बागवान, साहिल सैय्यद, तनवीर तंबोली, जिशान शेख, अल्ताफ सय्यद आदींनी केले होते.

# दिशा प्रतिष्ठानकडून 'दिशा शस्त्रक्रिया योजना'

## पाचव्या वर्धापनदिनानिमित्त उपक्रम

**लातूर/प्रतिनिधी**

शिक्षण, आरोग्य क्षेत्रात गरजूंना सदैव मदतीचा हात देणाऱ्या लातूर येथील दिशा प्रतिष्ठानच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त दिशा शस्त्रक्रिया योजना उपक्रम २१ मार्च ते २१ एप्रिल २०२५ दरम्यान राबविण्यात येणार आहे. ज्या रुग्णांना शस्त्रकिया करायला सांगितले आहे, पण आर्थिक परिस्थिति नसल्यामुळे ते करु शकत नाहीत अशा रुग्णानी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### नामांकित रूग्णालयात होणार शस्त्रक्रिय

**लातूर शहरातील** सह्याद्री हॉस्पिटल, पोतदार हॉस्पिटल, काळे हॉस्पिटल, गोरे हॉस्पिटल, सदासुख हॉस्पिटल, सिग्मा आय हॉस्पिटल, दत्तकृपा नेत्रालय या नामांकित रूग्णालयात रूग्णांच्या शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. यासाठी रूग्णांनी जुने रिपोर्ट, आधार कार्ड, रेशन कार्ड सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच सह्याद्री हॉस्पिटल, निदान डायग्नोसिस सेंटर, ओम साई लॅब येथे रक्त, सिटीस्कॅन, एमआरआयवर ५० टक्के सवलत दिली जाणार आहे.

यात न्जिओप्लास्टी, कॅन्सर, प्रोस्टेट ग्रंथी, मुतखडा, मणक्याचे आजार, ब्रेन ट्युमर, गादी सरकणे आदी आजारांवर औषधांसह मोफत शस्त्रक्रिया केल्या जाणार असल्याची माहिती दिशा प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आली आहे. या योजनेतून हाडांच्या शस्त्रक्रिया त्यात खुब्बा, गुडघा, कृत्रिम सांधेरोपण, फ्रोझन शोल्डर, टेनिस एल्बो यावर इंजेक्शन थेरपी, लिंगामेंट दुखापत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. डोळ्यांचे बिनटाक्याचे मोतीबिंदू, डोळ्यावरील पडदा काढणे, काळे बुबुळ बदलण्याची शस्त्रक्रिया, औषधी व कृत्रिम भिंगारोपण केले जाईल. तसेच कानाचा पडदा, नाकातील वाढलेले हाढ, घशाचे टौन्सिल्स, दुर्बिनीतून लासरूनीची शस्त्रक्रिया, स्वरयंत्र, कान, नाकाची दुर्बिनीद्वारे तपासणी. जनरल सर्जरीत हायड्रोसिन, खतना, हरनिया, मुळव्याध, शरीररातल चरबीच्या गाठी. स्त्रीरोग शस्त्रक्रियेत स्तनातील, गर्भाशय, अंडाशयाच्या गाठी आदी शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. यासाठी मात्र ५० टक्के खर्च दिशा प्रतिष्ठानकडून केला जाणार असून, उर्वरित ५० टक्के खर्च रूग्णांना करावा लागणार आहे.

गरजूंनी नाव नोंदणीसाठी दिशा प्रतिष्ठानच्या जिल्हा क्रीडा संकुलातील कार्यालयात सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत संपर्क करावा. योजनेचा लाभ २१ मार्च ते २१ एप्रिल २०२५ पर्यंत घेता येईल. अधिक माहितीसाठी दिशा प्रतिष्ठानचे अभिजीत देशमुख, सोनू डगवाले, इसरार सगरे, ॲड. वैशाली जाधव, जब्बार पठाण, विष्णू धायगुडे, अजय शहा यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.



## आ.देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त साई मंदिरात अभिषेक

**लातूर/प्रतिनिधी**

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा लातूरचे आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी लातूर येथील साई मंदिर येथे अभिषेक आरती मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली.

यावेळी ॲड. चंद्रकांत पाटील, डॉ. बालाजी साळुंके, पत्रकार हरिराम कुलकर्णी, प्रा.पद्माकर वाघमारे, मनोज देशमुख, श्रीनाथ माने, विकास देशमुख, अनिल घोरपडे, दयानंद बिडवे, दयानंद कांबळे, आनंद वैरागे, प्रवीण कांबळे, अनिल पाटील, रुपेश जोशी, नंदकुमार पाटील, सोमण वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

# स्कार्पिओ गाडीसह तब्बल ११६ किलो गांजा जप्त

## तेलंगाना, ओडिसा, औसा येथील तिघांविरूद्ध गुन्हा

**लातूर/प्रतिनिधी**

महात्मा फुलेनगर, औसा येथे एक व्यक्ती त्याच्या साथीदारसह राहत्या घरात गांजा अवैधरित्या ताब्यात बाळगून त्याची चोरटी विक्री करीत असल्याची माहिती औसा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड यांना मिळाली होती. यावरून पोलिसांनी सदर ठिकाणी छापा मारला असता, एक संशयीत स्कार्पीओ वाहनासह तब्बल ११६ गांजा पोलिसांच्या हाती लागला आहे.

याप्रकरणी रमेश आर यादाईह, वय ४५ वर्ष रा. ओबलपुर, जाफरगड वरगंल राज्य तेलंगणा, निबास लक्ष्मीकांत बडइ, रा. एमपीव्ही ८२ मलकागिरी, मलाभरम राज्य ओडिसा यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर वाहनाची झडती घेतली असता पोलिसांना गांजा आणि काही मोबाईल मिळाले. त्या दोघाकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी सदरचा गांजा परशुराम देविदास कांबळे, रा. फुलेनगर औसा. याने



आमच्याकडून विकत घेतला असल्याचे सांगितले. त्यावरून परशुराम कांबळे यांचे घराची झडती घेतली असता त्याच्या घरातपण पाच प्लॉस्टीकच्या गोण्या मध्ये लाहन मोठ्या आकाराचे प्लॉस्टीकने रॅपींग केलेले पॉकीटे व गाडी मध्ये मिळून आलेले असे एकुण ६७ गांजाची पॉकिटे मिळून आले. पोलिसांनी तब्बल ११६.१४किलो ग्रॅम वजानाचा ओला व सुखा गांजा, एक सिल्वर ब्लॅक रंगाची महिंद्रा स्कार्पीओ गाडी, दोन मोबाईल असा १५ लाख ८१ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत करून त्यांच्याविरूद्ध औसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. यातील परशुराम देविदास कांबळे हा फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक लातूर सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक लातूर डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी औसा कुमार चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे, प्रमोद बोंडले, स. फौ. संजय कांबळे, पोलीस अंमलदार रामकिशन गुटे, मुबाजोददीन सय्यद, मोतीराम घुले, भरत भुरे, गोविंद पाटील, बालीका सरवदे यांनी पार पाडली.

## ग्रामीण रुग्णालयातर्फे विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**अहमदपूर/प्रतिनिधी**

अहमदपूर येथील ग्रामीण रुग्णालयच्यावतीने राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम २.० अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी यशवंत विद्यालयाच्या सभागृहामध्ये करण्यात आली.

या आरोग्य तपासणीचे उद्घाटन प्राचार्य गजानन शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉक्टर शुभांगी सुडे, डॉक्टर नरहरी सुरनर, सहाय्यक गणेश केंद्रे, श्रीमती रेवता लेहाडे, उप मुख्याध्यापक माधव वाघमारे, प्रर्यवेक्षक राम तत्तापुरे यांच्या सह मान्यवरांची उपस्थिती होती. यशवंत विद्यालयातील पाचवी ते सातवीच्या ९५० विद्यार्थ्यांचे आणि आठवी ते नववीच्या १०५० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून त्यांना योग्य प्रकाराच्या सल्ला देऊन ज्यांचे गंभीर आजार आहेत, त्यांना ग्रामीण रुग्णालयामध्ये तपासणी करण्यासाठी सांगण्यात आले. प्रास्ताविक राम तत्तापुरे यांनी तर सूत्रसंचालन के. डी. बिराजदार यांनी केले. आभार श्रीधर लोहारे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# लाल मातीतील कुस्ती जगण्यासाठी डॉ. विश्वनाथ कराड यांचे प्रयत्न

## कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी हिंदकेसरी दीनानाथ सिंग यांचे प्रतिपादन

**लातूर/प्रतिनिधी**

आधुनिक काळातही लाल मातीवर प्रेम करणारे डॉ. विश्वनाथ कराड हे पुनम का चाँद आहेत. त्यांनी पैलवानांना आधार दिला आहे. त्यातून खेळाप्रती असणारे त्यांचे प्रेम दिसून येते. खऱ्या अर्थाने कुस्ती जगविण्यासाठी सातत्याने त्यांचे प्रयत्न आहेत. कुस्ती स्पर्धा सतत अशीच चालत राहावी, यासाठी पुढील पिढी तयार आहे. असे प्रतिपादन हिंदकेसरी दीनानाथ सिंग यांनी केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, पुरातन यज्ञभूमी रामेश्वर (रुई) ग्रामस्थ व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्म पूजक दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ संत एकनाथ महाराज षष्ठीचे औचित्य साधून लातूर येथील रामेश्वर (रुई) येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महा-वीर स्पर्धा २०२५ च्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी विश्वशांती केंद्र



आळंदी माईर्स एमआटी पुणे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रा. विश्वनाथ कराड हे होते. तर प्रमूख पाहूणे म्हणून लातूर ग्रामीणचे आ. रमेशअप्पा कराड, महाराष्ट्र केसरी अप्पासाहेब कदम, शिवछत्रपती पुरस्कार विष्णुतात्या जोशीलकर, महाराष्ट्र केसरी रावसाहेब मगर, पैलवान बंडा पाटील रेटरेकर, नजरूद्दीन नाईकवाडी, शिवछत्रपती पुरस्कार दिनेश गुंड, रामेश्वरचे माजी सरपंच तुळशीराम कराड, काशीराम कराड, डॉ. हनुमंत कराड, राजेश कराड, ऋषिकेश कराड,प्रा. विलास कथुरे उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, रामेश्वर (रुई) या छोट्याशा गावात जागतिक स्तरावरील पैलवान येत आहे, ही अभिमानास्पद बाब आहे. आमच्यावर विश्वास ठेऊन येथे येणाऱ्या पैलवानांसाठी आम्ही काबिल ठरण्याचा प्रयत्न करीत आहोत. हा खेळ परंपरेचा असून लोकांना जोडणारा असून भावी जीवनाला दिशा देणारा आहे. ही स्पर्धा १८ वर्षापासून सुरू आहे. तसेच येथे सर्वधर्मांचे मंदिर असल्याने हे गांव संपूर्ण जगभर मानवता तीर्थ म्हणून ओळखले जात आहे. मराठवाडा हा साधु संतांची भूमिका आहे. या पुढील काळात भारत देश संपूर्ण जगासमोर विश्वगुरू म्हणून उदयास येणार आहे. भारतीय संस्कृती आणि परंपरेचा संदेश स्वामी विवेकानंद यांनी जगासमोर ठेवला जात असल्याचे ते म्हणाले.

दरम्यान, यावेळी विष्णुतात्या जोशीलकर, प्रा. विलास कथुरे यांनीही आपले मनोगते व्यक्त केले. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रातून पैलवान आले आहेत. यात एकूण २०० पैलवान लात मातीत उतरणार आहेत. उद्घाटनाची कुस्ती कोल्हापुरचा अभिषेक जोगदंड व रामेश्वर रूई येथील जुणेद पठाण यांच्यात झाली. यामध्ये जुणेद पठाण हा विजयी झाला. तसेच पुणे येथील भालचंद्र कुंभार व पुण्याचाच सोनु कोलाटकर यामधील स्पर्धेत भालचंद्र कुंभार हा चितपटाने विजयी झाला. कुस्ती स्पर्धेचे धावते वर्णन समालोचक बाबा निम्हण यांनी केले. डॉ. महेश थोरवे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विलास कथुरे यांनी आभार मानले.

## डॉ. जनार्धन वाघमारे यांचे प्रतिपादन

# ग्रंथामध्ये ज्ञानाचे झरे, ज्ञानी बनण्यासाठी ग्रंथालयात जायला हवे

**लातूर/प्रतिनिधी**

ग्रंथासारखा दुसरा मित्र नाही. या जगात ज्याला कोणी नाही, त्याच्या पाठीशी ग्रंथ उभे राहतात. ग्रंथामध्ये ज्ञानाचे झरे असतात, ज्यांना ज्ञान मिळवायचे आहे, त्यांनी ग्रंथालयात जायला हवे, असे प्रतिपादन माजी खासदार,ज्येष्ठ विचारवंत तथा माजी कुलगुरू डॉ. जनार्धन वाघमारे यांनी केले. तसेच ग्रंथ हे जीवनात यशस्वी होण्याची प्रेरणा देतात, ग्रंथाचे मानवी आयुष्यातील मोल मोठे आहे. त्यामुळे प्रत्येकाने पुढील पिढीपर्यंत वाचन संस्कृतीचा ठेवा पोहचविला पाहिजे. यासाठी मुलांना ग्रंथाशी मैत्री करायला शिकविण्याची गरज असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे म्हणाल्या.

'लातूर ग्रंथोत्सव २०२४'चे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. वाघमारे हे होते. छत्रपती संभाजीनगर विभाग ग्रंथालय संघाचे कार्यवाह राम मेकले, लातूर जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे, साने गुरुजी शिक्षण संकुलचे अध्यक्ष कालिदास माने, साहित्यिक डॉ. जयद्रथ जाधव, आत्माराम कांबळे, माधव बावगे, हावगीराव बेरकिळे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. ग्रंथांचे मोल पैसा, संपत्तीमध्ये होवू शकत नाही. ग्रंथांमुळे आपला इतिहास समजला. आपल्या संस्कृतीचा ठेवा ग्रंथामध्ये सापडतो. संस्कृतीचे उज्ज्वल भवितव्य भाषेवर आणि ग्रंथावर अवलंबून असते. शिक्षणाचा प्रसार झाल्यानंतर वाचन संस्कृतीचा विकास होतो. वाचन



संस्कृती वाढविण्यासाठी चांगले ग्रंथ निर्माण झाले पाहिजेत. तसेच गाव तिथे ग्रंथालय ही चळवळ रुजविली गेली पाहिजे. 'ग्रंथ तिथे सौख्य' असे एका कवीने म्हटले आहे, त्यानुसार ज्या घरात ग्रंथ असतात, वाचन संस्कृती रुजलेली असते, तिथे शांतता आणि समृद्धी येते, असे डॉ. वाघमारे यावेळी म्हणाले. प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीमती काटकर यांनी केले. सूत्रसंचालन सी. पी. पाटील यांनी केले, राम मोतीपवळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

दरम्यान, राज्य शासनाचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय व लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्यावतीने लातूर येथील कम्युनिटी हॉल येथे आयोजित दोन दिवसीय 'लातूर ग्रंथोत्सव' निमित्त लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथून ग्रंथदिंडी काढण्यात आली. मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाचे सदस्य नरसिंग कदम, साने गुरुजी शिक्षण संकुलचे अध्यक्ष कालिदास माने, ज्ञानदान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव दिलीप गुंजरगे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर, साहित्यिक जयद्रथ जाधव, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाचे एच. बी. पाटील यावेळी उपस्थित होते. ग्रंथदिंडीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी पारंपरिक वेशभूषा केलेले विद्यार्थी, झांज पथक, लेझीम पथक यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. ढोल ताशे, टाळ मृदुंगाच्या गजरात ग्रंथ पालखी घेवून कम्युनिटी हॉल येथे आल्यानंतर या दिंडीचा समारोप करण्यात आला.

ग्रंथ हा माझ्या जिव्हाळ्याचा विषय आहे. ग्रंथांमुळे मला आयुष्यात यशस्वी होण्याची प्रेरणा मिळाली. मराठी ही आपली माय माऊली असून आपल्या मराठीला केंद्र शासनाने नुकताच अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे, ही प्रत्येक मराठी भाषिकासाठी अभिमानाची बाब आहे. डिजिटल युगात वाचन संस्कृती टिकविण्याचे आव्हान असले तरी प्रत्येकाने यासाठी पुढाकार घेवून आपल्या मुलांना वाचनाची आवड लावणे गरजेचे असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

बुके ऐवजी बुक भेट द्यावे, या आवाहनाला प्रतिसाद देत लातूर जिल्हा ग्रंथालय संघामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयाला ५०० ग्रंथ भेट दिले जाणार असून यापैकी प्रातिनिधिक स्वरुपात ५ ग्रंथ ग्रंथालय संघामार्फत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांना सुपूर्द करण्यात आले.

# तलाठी पदाच्या नोकरीचे बनावट आदेश देत १६ लाखांची फसवणूक

## वसमत शहर पोलिसात गुन्हा दाखल

**हिंगोली / प्रतिनिधी**

नोकरीच्या नावाखाली अनेकांची फसवणूक होत असून अशाच एका घटनेत हिंगोली जिल्हा निवड समितीच्या तलाठी पदाकरीता नोकरीचे बनावट आदेश देत १६ लाखांची फसवणूक केल्या प्रकरणी वसमत शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी की, परभणी जिल्ह्यातील एरंडेश्वर कमांडो करिअर अकॅडमी प्रशिक्षण केंद्राचे सतिष आप्पाराव राक्षसे यांची वसमत येथे बहिर्जी नगरात कमांडो करिअर अकॅडमी असल्याने या ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येते, १४ नोव्हेंबर २०२३ रोजी सतिष राक्षसे यांचा मित्र जितेंद्र मच्छेंद्र कांबळे रा. लिंबाळा (दौ) जि. लातूर याने सतिषला दूरध्वनीवर संपर्क साधून तलाठी किंवा वनरक्षक पदाची नोकरी लावण्याकरीता पुणे येथे नंदी चंद्रमुनी दिवाकर (रा. पिंपळे गुरव, पुणे) याला भेटण्यासाठी जायचे आहे, असे सांगितले. त्यावरून सतिष राक्षसे व जितेंद्र कांबळे हे दोघे पुणे येथे गेले होते. सदर ठिकाणी नंदी दिवाकर याने सतिषला तलाठी किंवा वनरक्षक पदाची नोकरी लावण्याचे आमिष दाखवून त्यासाठी रक्कम द्यावी लागेल, असे सांगितल्याने सतिषने आपल्या काही मित्रांकडून घेतलेले १६ लाख २ हजार रुपये नंदी याला वेळोवेळी पाठविले. त्यानंतर नंदी याने सतिषच्या व्हॉट्सअ‍ॅपवर तलाठी पदाची हिंगोली जिल्हा निवड यादीची पीडीएफ फाईल पाठवून त्यामध्ये सतिषचा आठवा क्रमांक असल्याचे दर्शविले. सतिषला तलाठी पदाची नोकरी लागल्याचा खुपच आनंद झाला. परंतु, त्याने निवड यादीची खात्री केली असता कुठेही त्याचे नाव दिसून आले नाही. त्यानंतर त्याने आपल्या व्हॉट्सअ‍ॅपवर पाठविलेल्या यादीची पुन्हा पडताळणी केली असता खाडतोड करून त्याचे नाव टाकल्याचे दिसून आले. यामध्ये आपली फसवूणक झाल्याचे सतिषला कळताच त्याने नंदीकडे पैसे परत देण्याची मागणी केली. परंतु, त्याने पैसे देण्याकरीता टाळाटाळ केल्याने २० मार्च रोजी सतिष राक्षसे यांनी वसमत शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून जितेंद्र मच्छींद्र कांबळे (रा. लिंबाळा (दौ) जि. लातूर), नंदि चंद्रमुनी दिवाकर (रा. पिंपळे सौदागर), पिंपळे गुरव पुणे या दोघांविरूध्द फसवणूकीचा गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक सुधीर वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक रावसाहेब कसबेवाड, जमादार प्रशांत मुंढे हे करीत आहेत.

# प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी पोहचवावे, उन्हाळ्यात जल टंचाईचे मोठे संकट

## नांदुरा येथील पाणी प्रश्नावर आ. प्रज्ञा सातव यांनी वेधले सरकारचे लक्ष !

**हिंगोली / प्रतिनिधी**





तालुक्यातील नांदुरा येथे जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे कामासंदर्भात व जिल्ह्यातील प्रलंबीत आणि नागरिकांच्या तक्रारी असलेल्या कामांची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी आमदार डॉ. प्रज्ञा सातव यांनी केली आहे.

ग्रामीण भागामध्ये प्रत्येक घरामध्ये हर घर नल, हर घर जल या योजनेने प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी पोहचवावा या उद्देशाने केंद्र शासनाने ही योजना राबविली. जलजीवन योजनेत हिंगोली जिल्ह्यात सहाशे पेक्षा जास्त कामांना मंजुरी मिळाली आहे. मात्र, त्यातील केवळ १८० कामे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे उर्वरित जवळपास ७० टक्के कामे प्रलंबित आहे. त्यामुळे २०१९ ला सुरु झालेली योजना अद्यापही पूर्ण झाली नसल्याने पाचव्या वर्षीही माझ्या लाडक्या बहीणीच्या डोक्यावरचा हंडा खाली उतरलेला नाही. ग्रामीण भागात पाण्यासाठी महिलांची भटकंती सुरुच आहे. त्यामुळे यंदाही उन्हाळ्यात टंचाई जाणवण्याची शक्यता आहे. नांदुरा येथील महिलांना त्रस्त होऊन जलकूंभावर चढून आंदोलन केले तरी लवकर दखल घेतली जात नाही. या योजनेत प्रत्येक घरात दरडोई ५५ लिटर पाणी देणार होते. हा उद्दिष्ट अद्याप पुर्ण झालेला नाही तो उद्दिष्ट कधीपर्यंत पूर्ण करणार आणि जिल्ह्यातील जलजीवन मिशनचे प्रलंबीत ७० टक्के कामे किती वेळ मर्यादेत पुर्ण करणार व जिल्ह्यातील जलजीवनच्या निकृष्ट कामाची चौकशी करुन कारवाई करणार का ? असे प्रश्न उपस्थित केले असता राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी या संदर्भात उत्तर देताना सांगितले की, नांदुरा येथील महिलांच्या आंदोलनानंतर चौकशी समिती नेमली होती आणि यानंतर तेथील प्रलंबीत कामे पुर्ण करण्यात आली व काही त्रुटीया आढळून आल्याने ते देखील दुरुस्त केल्या आहे आणि मुदतीत काम नाही केल्यामुळे संबंधिताला एक लाख रुपये दंड ही आकारण्यात आलो आहे. तसेच, प्रलंबित कामात दिरंगाई करणाऱ्यांवर ३३७ कंत्राटदारांना नोटीसा देऊन ९१ कारवाई करण्याचे संकेत त्यांनी दिले आहेत.

# डोरली येथे आज पहिली बौद्ध धम्म परिषद

**हदगाव / प्रतिनिधी**

तालुक्यातील डोरली येथे आज (दि.२२) पहिल्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी (दि.२२) सकाळी नऊ वाजता पंचशील ध्वजारोहण त्यानंतर पूज्य भन्ते भदासी शासन पूर्णा महाथेरो यांची धम्मदेशना होणार आहे. या धम्म परिषदेचे अध्यक्ष माजी उपनगराध्यक्ष सुनील सोनुले, उद्घाटक म्हणून आमदार बाबुराव कोहळीकर, दीपप्रज्वलन नांदेड जिल्हा परिषदेच्या माजी सभापती अनिता यांच्या हस्ते होणार आहे. विशेष उपस्थिती म्हणून डॉ. रेखा चव्हाण तर प्रमुख उपस्थितीमध्ये मनीष कावळे, संजय खंडागळे, माधव जमदाडे, सुधाकर निकाळजे, विजय खडसे, प्रशांत हिंगोले, निळू पाटील, संतोष हराळे, प्रमुख मार्गदर्शक आबासाहेब वानखेडे, अभय वाठोरे, बोधीवृक्ष कदम, जयश्री राऊत, विजय एगडे, अमोल कदम, भीम शाहीर माधव वाढवे, बबन भालेराव, बापूसाहेब वाठोरे या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष गावचे सरपंच नथू जारंडे या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते प्रा. जालिंदर वाहूळ, दादासाहेब शेळके, रात्री आठ वाजता सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सुप्रसिद्ध गायक विशाल ओआळ व सुप्रसिद्ध गायिका तेजस्विनी पांडववीर यांचा भीम गीतांचा मुकाबला होणार आहे. या धम्म परिषदेला सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन या धम्म परिषदेचे मुख्य आयोजक अनिल शेळके यांनी केले आहे.

> उपस्थित राहण्याचे आयोजक अनिल शेळके यांचे आवाहन

# हिंगोलीत नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी संकेतस्थळ केले अद्ययावत !

## पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची माहिती

**हिंगोली / प्रतिनिधी**

मुख्यमंत्री यांच्या शंभर दिवसाच्या कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील नागरिकाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून हिंगोली पोलिसांनी आपले संकेतस्थळ अद्यावत केले असून याचा नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले आहे.

हिंगोली जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळ ृ.हळपसेश्रळेंश्रिळलश.सीं.ळप अद्ययावत करून नागरीकांना सहजासहजी घरबसल्या पोलीस मदत मिळण्याकरीता सुविधा संकेतस्थळाचे माध्यमातून उपलब्ध करून दिली आहे. १०० हिंगोली पोलिस दलाने त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर नव्याने सुधारणा केल्या आहेत. या अद्ययावत संकेतस्थळामध्ये नागरिकांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विशेषतः नागरिकांना घरबसल्या काही महत्त्वाच्या सेवांचा लाभ घेता यावा, या उद्देशाने सापडलेल्या व हरवलेल्या वस्तू, भाडेकरू माहिती, नागरिक सतर्कता संदेश तसेच महत्त्वाचे क्रमांक, संकेतस्थळ,



हरवलेली व्यक्ती, अनोळखी/ सापडलेला मृतदेह, एफआयआर, चोरीची व सापडलेली वाहने, महिला सुरक्षा आणि ज्येष्ठ नागरिक यांसारख्या अद्ययावत टॅब्स नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत.या सुविधेमुळे नागरिकांना हरवलेल्या वस्तूंची माहिती ऑनलाइन पद्धतीने नोंदविता येणार असून, सापडलेल्या वस्तूंची माहिती देखील सहजरीत्या तपासता येणार आहे. यामुळे नागरिकांचा वेळ आणि श्रम वाचणार असून, त्यांची हरवलेली महत्त्वाची कागदपत्रे, वस्तू किंवा साहित्य सहजपणे शोधणे शक्य होणार आहे.या सुविधेमुळे नागरिकांना घरभाडेकरूंची माहिती ऑनलाइन स्वरूपात नोंदविता येणार आहे. यामुळे पोलिसांना परिसरातील भाडेकरूंची माहिती त्वरित उपलब्ध होणार असून, सुरक्षा व्यवस्थेत सुधारणा होण्यास मदत होणार आहे.या सुविधेमुळे नागरिकांना महत्त्वाच्या सूचना, सतर्कतेचे संदेश आणि सुरक्षाविषयक माहिती त्वरित मिळू शकेल. यामुळे नागरिकांना ताज्या घडामोडींची माहिती घरबसल्या मिळू शकते.हिंगोली पोलिस दल नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी सदैव तत्पर असून, या नव्या सुविधा नागरिकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आल्या आहेत. नागरिकांनी या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन हिंगोली पोलिस दलाने केले आहे जिल्ह्यातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हिंगोली पोलीस दल सदैव तत्पर असून नागरिकांना तातडीने सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी संकेतस्थळात अद्यावत सुधारणा करीत नव्या सुविधा नागरिकांसाठी सुरु केल्या असल्याची माहिती पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दैनिक गांवकरीशी बोलताना दिली.

# शिवाजी महाविद्यालयातील रोजगार मेळाव्यात १०६ उमेदवारांची प्राथमिक निवड

**हिंगोली / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर हिंगोली व शिवाजी महाविद्यालय, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच येथील शिवाजी महाविद्यालयात पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यास जिल्ह्यातील दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा व पदवी तसेच पदवीधारक या पात्रतेच्या २४८ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १०६ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे.

या रोजगार मेळाव्यात महाराष्ट्रातील विविध नामांकीत कंपनीचे उद्योजक उपस्थित होते. तसेच, जिल्ह्यात विविध महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देण्यासाठी विविध महामंडळाचे स्टॉल लावले होते. या मेळाव्यात मार्गदर्शन करताना शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य क्षीरसागर यांनी चांगल्या ठिकाणी आत्मविश्वासाने मुलाखत द्यावी व आपल्यातल्या सूप्त गुणांना वाव द्यावा, असा संदेश दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सहायक आयुक्त डॉ. रा.प्र. कोल्हे यांनी रोजगार मेळाव्याचा हेतू विशद करताना म्हणाले की, युवकांनी बेकार बसून दीड जीबीचा डाटा खर्च करण्यापेक्षा मिळेल ती कामे स्वीकारावीत. या संधीतून मिळालेल्या कामाचा अनुभव पुढील संधीसाठी उपयोगी ठरणार आहे. त्यामुळे युवकांनी मेळाव्यामध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदवून रोजगार प्राप्त करुन घ्यावा, असे आवाहन केले. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री. बोथीकर यांनी कंपनीमध्ये मिळणाऱ्या पगाराचा विचार न करता आपल्याला अनुभव कसा मिळेल यासाठी प्रयत्न करावा, असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. शिराळे यांनी केले. या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता हिंगोली या कार्यालयाचे नवनाथ टोनपे, मनोज लोखंडे, महेश राऊत, राजाभाऊ कदम, नागेश निरदुडे, रमेश जाधव, पवन पांडे, अमोल आडे, अभिजीत अलोने आणि शिवाजी महाविद्यालयाचे प्राध्यापक व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# मुळात मुख्यमंत्री बाल आशीर्वाद योजना नाहीच !

**हिंगोली / प्रतिनिधी**

> नागरिकांनी फसव्या जाहिरातींना बळी न पडण्याचे आवाहन

सध्या समाज माध्यमावर मुख्यमंत्री बाल आशीर्वाद योजनेच्या नावाने संदेश प्रसारित केले जात आहे. महिला व बाल विकास विभागाकडून मुख्यमंत्री बाल आशीर्वाद योजना अस्तित्वात नाही. ही फसवी जाहिरात असून नागरिकांनी समाज माध्यमावर येणाऱ्या अशा फसव्या पोस्टवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.. १ मार्च २०२० नंतर ज्यांचे दोन्ही पालक अथवा एक पालक मृत्यू झाला आहे आणि त्या बालकाचे वय १८ वर्षापेक्षा कमी आहे अशा कुटुंबातील दोन मुलांना बाल सेवा अंतर्गत दरमहा ४ हजार रुपये मिळणार आहेत. या योजनेचे अर्ज तहसील कार्यालयामध्ये उपलब्ध करण्यात आल्याचे चुकीचे मेसेज व्हायरल होत आहे. अनाथ किंवा एकल पालक बालकांसाठी महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेबाबत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, कार्यालय एस. ७, दुसरा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, हिंगोली येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांनी कोणत्याही फसव्या संदेशांना बळी पडू नये व आर्थिक व्यवहार करु नयेत. तसेच अनाथ किंवा एकल पालक बालकांसाठी महिला व बाल विकास विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनाकरीता कार्यालयांमध्ये संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पदवीधर विद्यार्थ्यांनी कौशल्याचा विकास करावा : उद्योजक कृष्णा भोसले

## कै. शेषाबाई सिताराम मुंडे महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ संपन्न

**गंगाखेड / प्रतिनिधी**



येथील कै. शेषाबाई सिताराम मुंडे महाविद्यालयातील परीक्षा विभाग व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने पदवी वितरण समारंभ शुक्रवारी (दि.२१) आयोजित करण्यात आला.

या पदवी वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून युवा उद्योजक सुभाशिष अ‍ॅग्रो लिमिटेडचे संस्थापक अध्यक्ष कृष्णा भोसले हे होते. कृष्णा भोसले यांच्या हस्ते पदवीधर विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बालाजी ढाकणे, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा.डॉ. अशोक केंद्रे, परीक्षा विभाग प्रमुख प्रा.डॉ. लहू फड व महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.डॉ. राजीव आहेरकर हे उपस्थित होते. याप्रसंगी पदवीधर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत भोसले यांनी स्वतःचा अनुभव सांगितला ग्रामीण भागातून आंतरराष्ट्रीय पातळीवर कशा पद्धतीने स्वतः चा उद्योग निर्माण केला हे आपल्या विचारातून सांगितले. या आधुनिक युगामध्ये विद्यार्थ्यांनी नोकरीवर अवलंबून न राहता स्वतःतील क्षमता ओळख कौशल्यांचा विकास करावा व स्वावलंबी बनावे, असे मार्गदर्शन केले. हा पदवी वितरण कार्यक्रम स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या यांच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे साजरा करण्यात आला. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. ढाकणे यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ. बबन गित्ते, प्रा. नामदेव लटपटे, प्रा.डॉ. साहेब सातपुते, प्रा.डॉ. रेखा बने, प्रा.डॉ. अरुण मुंडे, प्रा. सिद्धार्थ शिंदे, गंगाधर मुरकुटे, बाळासाहेब मुंढे व महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विठ्ठल टेकाळे, प्रास्ताविक प्रा.डॉ. अशोक केंद्रे व प्रा.डॉ. सुभाष यादव यांनी केले.

## वसमत हळद संशोधन केंद्र येथे बेण्याच्या विक्रीचा शुभारंभ

# शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बेणे माफक दरात, नवनवीन वाण उपलब्ध

**वसमत / प्रतिनिधी**



बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र वसमत येथे खरीप हंगाम २०२४ मध्ये हळदीच्या विविध वाणांची लागवड करण्यात आली होती. या हळद वाणापैकी जे वाण चांगले उत्पादन देत आहेत अशा वाणांचे हळदीचे बेणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील यांनी सूचना दिल्या होत्या. व्यवस्थापकीय संचालक, राजेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली या हळदीचे बेणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी केंद्राच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

नुकत्याच झालेल्या नियामक मंडळाच्या बैठकीत हेमंत पाटील यांनी संशोधन केंद्राचे व्यवस्थापकीय संचालक यांना सूचना देत केंद्रावरील जातिवंत, शुद्ध, निरोगी बेयणे शेतकऱ्यांना माफक दरात उपलब्ध होईल या दृष्टीने दर निश्चित करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याबाबत सर्व अधिकार दिले. नियमक मंडळाच्या बैठकीत याबाबतीत चर्चा होऊन बेण्याचे अतिशय माफक दर जाहीर करण्यात आले. या भागातील सेलम व गतवर्षी चांगले उत्पन्न दिलेल्या फ ुले स्वरूप या वाणाचे दर प्रति क्विंटल ४ हजार रुपये याप्रमाणे निश्चित केले आहेत. तसेच, याच वाणाचा बंड्याचा दर ३ हजार रुपये प्रति क्विंटल असा ठरवण्यात आला. काही प्रमाणात इतर वाणांचे बेणे उपलब्ध असल्यामुळे व जास्तीत जास्त हळद उत्पादक शेतकऱ्यांना नवनवीन वाण उपलब्ध करून देण्याबाबत हळदीची जोमदार, शुद्ध व निरोगी रोपे निर्मिती करण्यासाठी सूचना दिल्या व त्या रोपांची किंमतही अतिशय माफक दरात हळद उत्पादक शेतकरी बांधवांसाठी उपलब्ध करून देण्याबाबत ना नफा या तत्वावर रोपे तयार करून देण्यासाठी सूचना दिल्या. नियामक मंडळाच्या संचालक यांनी याबाबतीत त्यांचे मत मांडत शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाचे गुणवत्तापूर्ण बेणे माफक दरात उपलब्ध होत असल्याबाबत समाधान व्यक्त केले. या बेण्याची मोठ्या प्रमाणावर निर्मिती व्हावी व त्या वाणांचा प्रचार प्रसार व्हावा यासाठी रोपांची शेतकऱ्यांमध्ये उपलब्धता करून दिल्यास त्यातून येत्या काळात मोठ्या प्रमाणावर बेण्याची उपलब्धता होईल व वाणांची उत्पादकताही समजून येईल असे सांगितले.

मंडळाच्या बैठकीत बेणे विक्रीचे दर निश्चित केल्याप्रमाणे आज बेणे विक्रीचा शुभारंभ करण्यात आला. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर वसमत तालुक्यातील आंबा चोंडी येथील प्रगतिशील शेतकरी संजय भोसले यांनी जगप्रसिद्ध लॅकडोंग हळदीच्या बेण्याची खरेदी केली. त्यांचा सत्कार संशोधन केंद्राच्या वतीने रमाकांत भुरे यांनी केला. आपल्या भावना व्यक्त करताना संजय भोसले या युवा हळद उत्पादक शेतकऱ्यांने संशोधन केंद्राच्या माध्यमातून अतिशय दुर्गम भागातील शेतकऱ्यांना परराज्यातील व महाराष्ट्रापासून अति दूर असलेल्या मेघालय राज्यातील बियाणे अतिशय माफक दरात मिळवून दिल्याबाबत हेमंत पाटील यांचे आभार मानले. तसेच, व्यवस्थापकीय संचालक व हळद संशोधन केंद्रावरील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करत आभार मानले.

### साडेपाच ते सहा महिन्यातच हळद तयार होऊ शकते

सोयाबीनचे दर दिवसेंदिवस कमी होत असल्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना जिथे पाण्याची कमी उपलब्धता आहे, अशा शेतकरी बांधवांसाठी कमी कालावधीच्या हळदीचे बेण्याची उपलब्धता होऊन जास्तीत जास्त पावसाच्या पाण्यावर हे पिक कसे घेता येईल यासाठी प्रयत्न करावेत, तसेच या हळदीचा कालावधी कमी करण्यासाठी रोपांपासून लागवड केल्यास साडेपाच ते सहा महिन्यातच हळद तयार होऊ शकते व सोयाबीन खालील काही भाग या पिकाखाली आणता येऊ शकतो, असे सांगितले. अशा शेतकऱ्यांना रोपांची उपलब्धता तसेच दर्जेदार व शुद्ध रोपांसह शक्य असेल तेथे बेणे उपलब्ध करून देण्याबाबत, शेतकऱ्यांना चांगली जातीवंत शुद्ध रोपे बेणे करून देण्याबाबत आश्वासित केले.

### शेतकऱ्यांना सुवर्णकाळ येईल

या संशोधन केंद्राच्या माध्यमातून हळद उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होत नक्कीच चांगले दिवस येतील व हळद उत्पादनात सुवर्णकाळ येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. केंद्राच्या उभारणीसाठी त्यांनी करत असलेल्या प्रयत्नांसाठी यश मिळावे व हिंगोली सारख्या उद्योग व्यवसायात पिछाडीवर असलेल्या जिल्ह्यात एक चांगले सुसज्ज व सर्व सोयी–सुविधांसह राज्यासह जगातील सर्वात चांगले संशोधन, प्रशिक्षण, प्रक्रिया, निर्यात या हळदीशी संबंधित सर्व घटकांनी परिपूर्ण असलेले केंद्र गतीने मार्गी लागत पुर्ण व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# लाखो वारकऱ्यांनी घेतले नाथांचे दर्शन; भक्तीरसात बुडाली पैठण नगरी

## वारकऱ्यांची अलोट गर्दी, दर्शनासाठी रांगाच रांगा

मुफीद पठाण





**पैठण :** श्रीक्षेत्र पैठण येथे सुरू असलेल्या ४२६ व्या नाथयात्रा महोत्सवाने लाखो भाविकांच्या उपस्थितीत भक्तिरसाची उधळण केली. संत एकनाथ महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत वारकरी संप्रदायाच्या टाळ-मृदंगाच्या निनादाने वातावरण भक्तीमय झाले आहे.

गोदावरी तिरी गंगास्नान, भजन-कीर्तन आणि संत प्रवचनांच्या माध्यमातून नाथभक्तांनी अध्यात्मिक अनुभूती घेतली. नाथ समाधीचे दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी बघावयास मिळाली. यानिमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो वारकरी, भक्त आणि भाविक पैठणमध्ये दाखल झाले.पहाटेच्या प्रहरी पवित्र गंगास्नानाचा सोहळा पार पडला. नाथ समाधी मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी मोठी रांग लावली होती.टाळ-मृदंगाचा गजर, हरिपाठ आणि नामस्मरणाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.नाथ महाराजांच्या पद्म पालखी सोहळ्याला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पालखीने नाथनिवास ते गोदावरी वाळवंटमार्गे नाथ समाधी मंदिराकडे प्रस्थान केले. यावेळी 'भानुदास एकनाथ, ज्ञानबा तुकाराम' अशा जयघोषात वारकरी दंग झाले.

दरम्यान, श्रीक्षेत्र पैठण येथे सुरू असलेल्या नाथयात्रा महोत्सवात आज खा.संदीपान भूमरे यांनी हजेरी लावत नाथ समाधीचे दर्शन घेतले. हजारो नाथभक्त आणि वारकरी संप्रदायाच्या उपस्थितीत त्यांनी नाथ महाराजांच्या चरणी नतमस्तक झाले.

### संत–महंतांचा सन्मान आणि महाप्रसाद वाट

नाथयात्रा महोत्सवाच्या निमित्ताने राज्यभरातून आलेल्या संत–महंतांचा विशेष सन्मान करण्यात आला.नाथ विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष तथा आमदार विलास भूमरे यांनी प्रमुख दिंडी प्रमुख आणि संत–महंत यांना 'नाथप्रसाद' देऊन गौरविले. यावेळी विठ्ठल महाराज शास्त्री चनघटे, प्रा. गणेश मोहिते, नामदेव खरात आदी मान्यवर उपस्थित होते. नाथ समाधी मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले, जिथे हजारो भक्तांनी प्रसादाचा लाभ घेतला.

### नाथयात्रेचा आज समारोप

आज शनिवार रोजी (दि.२२) सूर्यास्ताच्या वेळी कालाष्टमी सोहळा पार पडणार आहे. नाथवंशजांच्या हस्ते दहीहंडी फोडून नाथयात्रेची सांगता होईल. कालप्रसादानंतर वारकरी संप्रदायाच्या दिंड्या आपल्या गावी परततील. नाथयात्रेच्या निमित्ताने संपूर्ण पैठण नगरी भक्तीरसात न्हाली असून, महाराष्ट्रातील एक मोठा आध्यात्मिक सोहळा अत्यंत भक्तीभावाने संपन्न होत आहे.

# गंगापूर तालुक्यात २४ ग्रामपंचायतींचे १०१ सदस्य अपात्र

## निवडणूक खर्चाचा हिशोबच दिला नाही, प्रशासनाची मोठी कारवाई

गंगापूर/प्रतिनिधी

### नियमभंगामुळे मोठी कारवाई

ग्रामपंचायत निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांना निवडणूक खर्चाचा हिशोब विहित कालावधीत सादर करणे बंधनकारक असते. मात्र, १०१ सदस्यांनी हा हिशोब दिला नसल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतला आहे

गंगापुर तालुक्यातील २४ ग्रामपंचायतींच्या १०१ सदस्यांना निवडणूक खर्चाचा हिशोब न सादर केल्याने अपात्र ठरवण्यात आले आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १४-ब (१) अन्वये हा आदेश दिला आहे. यामुळे हे सदस्य २५ फेब्रुवारी २०२५ पासून पुढील पाच वर्षांसाठी ग्रामपंचायत निवडणूक लढवू शकणार नाहीत.

गंगापुर तालुक्यातील २४ ग्रामपंयतीच्या १०१ सदस्यांनी विहीत मुदतीमध्ये व रितीने निवडणूक खर्चाचा हिशोब सादर केला नसल्यामुळे त्यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४-ब (१) मधील तरतूदींचे भंग केला असल्याचे स्पष्ट होते. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाचे आदेशाने जिल्हाधिकारी स्वामी यांनी गंगापूर तालुक्यातील १०१ उमेदवारांनी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूकीचा निकाल प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून म्हणजेच २० डिसेंबर २०२२ ते १९ जानेवारी २०२३ या कालावधीमध्ये आणि रितीने निवडणूक खर्चाचा हिशोब देण्यास कसूर केला आहे. आणि अशा कसूरीसाठी त्यांच्याकडे कोणतेही योग्य कारण किंवा समर्थन नाही अशी खात्री झाल्यामुळे आगर वाडगाव- साबेराबी पठाण, भोयगाव रेखा शामलाल खोलवाल, प्रल्हाद रामलाल महेर, गीता रामकिसन चरांडे, बुट्टेवाडगाव- पुष्पा रामनाथ गायकवाड ,संजय खेडकर, देवळी- सुनिता सतीश तायडे, सोनाली आप्पासाहेब वंजारे, तवेरा इमाम पठाण, मुमताज मुसा पठाण, धामोरी बुद्रुक- योगेश शेळके, सुधाकर वाघ, अशोक मोरे, जयश्री रवींद्र गायकवाड, शकुंतलाबाई अर्जुनराव कीर्तीशाही, निकिता नितीन साळवे , अर्चना अर्जुन कीर्तीशाई, दिघी- ताराबाई हरिश्चंद्र पवार, लंकाबाई बाबासाहेब काठोडे, सचिन गायकवाड ,कविता प्रल्हाद गायकवाड, दिनवाडा- भाऊसाहेब ठोंबरे, मंगल रतन सोनवणे, अलकाबाई नाना ठोंबरे, सिंधुबाई प्रभाकर कांबळे, ताराचंद शेजवळ, मंगल संजय शेजवळ ,मिनाबाई दामोदर गायकवाड ,मनोहर कांबळे, लक्ष्मण गायकवाड, प्रभाकर कांबळे, प्रल्हाद सोनवणे यांच्यासह १०१ सदस्यांना अपात्र ठरविले आहे.

यांना ग्रामपंचायत निवडणूकीसाठी या आदेशाच्या २५ फेब्रुवारी २०२५ या दिनांकापासून पुढील पाच वर्षाच्या कालावधीकरीता ग्रामपंचायत सदस्य राहण्यास किंवा असा सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविण्यात येत असल्याचे आदेश काढले आहेत. या आदेशाविरुध्द राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडे विहीत मुदतीत अपील दाखल करता येणार असल्याचे सांगितले आहे.

# शासकीय योजनेतील कामे सुरू करा, कामांसाठी मजुर धडपडतोय

बाजार सावंगी/प्रतिनिधी

खुलताबाद तालुक्यातील ग्रामीण भागात मजुरांच्या हाताला काम नसल्याने मजुर कामासाठी धडपडतोय असल्याचे चित्र असून शासकीय योजनेतून कामे सुरू करण्याची मागणी होत आहे.

सद्या रब्बी पिक हंगाम सुरू असला तरी शेती कामे जवळजवळ यांत्रीकाकरणातून होताना दिसत आहे. गहु मका सोंगणी असो की पेरा शेतकरी यंत्राने करत आहे.तर ठिकठिकाणी विविध विभागाचे विविध कामे ही यंत्रा द्वारे होताना दिसत आहे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना चे कामेही शेत मजुरांच्या हाती येताना दिसत नाही. त्यात मजुरीचे दर कमी असल्याने मजुर ही ते काम करण्याच्या तयारीत दिसत नाही. त्यात परप्रांतीय मजुर ही ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात कामा साठी आल्याने त्याचाही परिणाम स्थानिक मजुरावर पडला आहे. व त्यात स्थानिक मजुरा ऐवजी स्थानिक मालक काम करुन घेणारे ही परप्रांतीय ना प्रथम पसती देत आहे. त्यांचे म्हणणे आहे की, परप्रांतीय मजुर वेळेवर व अधिकचे काम करतो तर स्थानिक मजुर चालढकल वेळ मारून नेतो. तर शासनाकडून मजुरांसाठी सद्या तरी खुलताबाद तालुक्यात कोठे कामे उपलब्ध नाही व सुरुही नाही. शेत मजुरांना काम उपलब्ध नसल्याने तो कामाच्या शोधात आहे. त्याच्यासाठी शासनाकडून रेशन मिळत असले तरी इतर वस्तू खरेदीला घेण देणाला पैशे हवे असते व सद्या कोठेच काम उपलब्ध नसल्याने मा जिल्हाधिकारी व तहसीलदार यांनी याबद्दल तातडीने कामे काढण्याची व मजुरांना उपलब्ध करून देण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

## पैशाची मागणी, महीलेला मारहण करून घराबाहेर काढले

**शिऊर :** वैजापूर तालुक्यातील कोरडगाव येथील एका महीलेचा छळ करून माहेरहून पैसे घेऊन ये असे म्हणत घराबाहेर काढून दिल्याची घटना (दि. २० आक्टोबर २०२४)रोजी घडली.

कोरडगाव येथील राजाराम विश्वनाथ बागूल रा. कोरडगाव (ह. मु. नाशिक) यांचा विवाह मागिल काही वर्षांपूर्वी झाला होता. परंतू सदरील फिर्यादी २० ऑक्टोबर २०२४ रोजी आरोपीच्या घरी गेली तेव्हा आरोपीने सदरील फिर्यादीला तु माहेरहून पैसे घेऊन येण्याची मागणी केली. तेव्हा फिर्यादीने माहेरची परिस्थिती तशी नसल्याचे सांगितले. यावरून आरोपीने शिवीगाळ व मारहाण करून आमच्या घरी राहू नको, आमच्या घरातून निघून जा असे म्हणत फिर्यादीस घरातून काढून दिले. याप्रकरणी आरोपी राजाराम विरूद्ध गुरूवारी (दि. २०)शिऊर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव रणखांब करत आहेत.

## बारा वर्षीय मुलीचा विनयभंग : टवाळखोरांविरुद्ध गुन्हा दाखल

वैजापूर/प्रतिनिधी

इयत्ता सातवीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या बारा वर्षाच्या मुलीचा हात पकडून तिचा विनयभंग करणाऱ्या एका टवाळखोराविरुद्ध वैजापूर पोलिस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुकेश त्रिभुवन (२४, रा.वैजापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. घटनेतील पीडित बारा वर्षीय मुलगी ही वैजापूर शहरातील एका शाळेत इयत्ता सातवीच्या वर्गात शिक्षण घेते. दरम्यान २० मार्च रोजी सकाळी आठ वाजता पीडित मुलगी शाळेत गेली. दुपारी साडे बारा वाजता मुलगी रडत-रडत घरी परतली. घरी आल्यानंतर तिने तिच्या आईला सांगितले की, मुकेश त्रिभुवन याने माझा हात पकडुन मला चिठ्ठी दिली व म्हणाला की, तु मला खुप आवडते हा माझा मोबाईल नंबर असल्याचे सांगितले. यावेळी मुलीच्या आईने शाळेत धाव घेतली. मुलीच्या मैत्रणीने देखील घडलेला प्रकार तिच्या आईला सांगितला. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून मुकेश त्रिभुवन याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बाधीत शेतकऱ्यांचे लक्ष आता समितीच्या अहवालाकडे

## उच्च न्यायालयात याचीका दाखल

करमाड/प्रतिनिधी



करमाड ते चित्ते पिंपळगाव रस्तेचा मावेजा मिळण्याबाबत मंगरूळ व इतर गावातील शेतकऱ्यांनी छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाच्या खंडपीठात जागतिक बँक कार्यकारी अभियंत्याचे विरोधात अवमान याचीका दाखल केली आहे. याचिकाच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्याने गठित केलेल्या समितीने मंगळवारी ( दि. १८ ) रस्त्याची प्रत्यक्ष मोजणी केली. समिती प्रत्यक्ष मोजणीचा अहवाल जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करणार आहे. बाधित शेतकऱ्यांचे लक्ष आता समितीच्या अहवालाकडे लागले आहे.

मंगरूळ व इतर गावातील शेतकरी करमाड ते चिते पिंपळगाव( ता. संभाजीनगर) रस्त्यात गेलेल्या जमिनीचा मावेजा मेळावा म्हणून अनेक वर्षांपासून शासनाकडे मागणी करीत आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने कोर्ट कमिशनरची नेमणूक करून करमाड ते चित्तेपिंपळगाव रस्त्याची मोजणी करून तसा अहवाल न्यायालयाला सादर केला. असे असतानाही जिल्हाधिकाऱ्यांमार्फत रस्ता रुंदीकरणाचा चुकीचा अहवाल सादर करून न्यायालयाचा अवमान केला. ही बाब मंगरूळ येथील बाधीत शेतकरी कचरू आर व मच्छिंद्र शिंदे यांनी लक्षात आणून दिल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तहसीलदार, जागतिक बँकेचे कार्यकारी अभियंता, उपअधीक्षक भूमी अभिलेख, मंडळ अधिकारी व तलाठी सदस्य असलेली समिती गठीत केली. या समितीने प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून रस्ता व शेतकऱ्यांच्या जमिनीच्या हद्दी खुणा निश्चित करून सदरक्षेत्र संबंधित खासगी जमीन मालकांचे आहे किंवा कसे ? हे तपासण्याच याबाबत समितीला आदेश दिले होते. त्यानुसार उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड, संभाजीनगर ग्रामीणचे तहसीलदार रमेश मुंडलोड, भूमी अभिलेखचे नितेश मुंडे, सार्वजनिक बांधकाम विभाग जागतिक प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंता प्रिया पुजारी, मंडळ अधिकारी रघुनाथ शेळके, तलाठी तनुजा जगताप यांनी अवमान याचिका दाखल करणाऱ्या कचरू आर व मच्छिंद्र शिंदे या शेतकऱ्यांसमोर जमिनीची मोजणी केली. जमिनीचा मोजणीचा अहवाल ही समिती आता जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करणार आहे.

# गंगापूर येथील खरेदी विक्री संघात शासकीय तूर खरेदीचा शुभारंभ

## भाऊसाहेब बाराहाते यांच्या हस्ते सुरूवात, शेतकऱ्यांना योग्य दरात तूर विक्रीची संधी

गंगापूर/ प्रतिनिधी




गंगापूर येथील खरेदी विक्री संघात शासकीय तूर खरेदीचा शुभारंभ भाऊसाहेब बाराहाते यांच्या हस्ते करण्यात आला. यावर्षी शासकीय तूर खरेदी ७ हजार ५५० रुपये प्रति क्विंटल दराने सुरू करण्यात आली आहे. अंबादास काळे या शेतकऱ्याने प्रथम तूर विक्री करण्यासाठी आणली होती.

या कार्यक्रमात खरेदी विक्री संघाचे चेअरमन लक्ष्मण भुसारे यांनी सर्व तालुक्यातील शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, गंगापूर खरेदी विक्री संघात शासकीय दराने तूर खरेदी सुरू झाली असून, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी तूर विक्री करण्यासाठी आणावे. त्यांनी शेतकऱ्यांना २५ मार्चपर्यंत तूर विक्रीसाठी ऑनलाइन नोंदणी करण्याचेही आवाहन केले. या कार्यक्रमात गंगापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब पदार, खरेदी विक्री संघाचे व्हॉइस चेअरमन आप्पासाहेब पाचपुते, संचालक प्रताप पवार, मार्केट कमिटीचे संचालक तौफिक पठाण, सचिव भास्कर पवार यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

या शासकीय तूर खरेदी योजनेमुळे शेतकऱ्यांना योग्य दरात त्यांच्या उत्पादनाची विक्री करण्याची संधी मिळेल आणि त्यांना आर्थिक फायदा होईल. शेतकऱ्यांनी या योजनेचा जास्तीत जास्त फायदा घेण्यासाठी ऑनलाइन नोंदणी करून तूर विक्रीसाठी आणण्याचे खरेदी विक्री संघाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

# डोणगाव येथे २४ वर्षीय तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

कन्नड / प्रतिनिधी



तालुक्यातील डोणगाव येथील २४ वर्षीय तरुणांने स्वतःच्या डोणगाव शिवारातील गट क्रमांक ८६ मधील शेतात असलेल्या चिंचेच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ( ता.२०) ला गुरुवारी सकाळी उघडकीस आली. अतुल रमेश शेजवळ (२४) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.

याबाबत अधिकची माहिती अशी की, मयत अतुल यांचे बहिरगाव विद्युत मोटार रिवाईडींग दुकान आहे. त्याने बुधवारी (ता.१९) रात्री नऊ वाजेपर्यंत मोटार रिवाईडींगचे काम केले. दुकान बंद करुन तो घरी न जाता तो थेट शेतात गेला. अतुल चुलते हरीदास शेजवळ हे सकाळी शेतातील विद्युत मोटार चालू करण्यासाठी शेतात गेले असता अतुल हा त्यांना शेतात असलेल्या चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन लटकलेल्या अवस्थेत दिसला. घटनेची माहिती कन्नड शहर पोलिसांना मिळताच पोलीस निरीक्षक रघुनाथ सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक टी. पी. पवार, पोलीस कॉन्स्टेबल एल. एस. चव्हाण यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. याप्रकरणी कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास टी. पी.पवार करत आहेत.

# वैजापूरात शेतकऱ्यांना कांद्याचा लिलाव पाडला बंद : मुख्य प्रवेशद्वाराला ठोकले टाळे

वैजापूर/प्रतिनिधी

शेतकऱ्यांकडून वायद्यावर कांदा घेतल्यास व्यापाऱ्यांना खेळत भांडवल असते त्यामुळे शंभर ते दीडशे रुपये अधिकच्या दराने कांदा खरेदी करण्यास परवडते. मात्र मागील काही दिवसांपूर्वी सागर राजपूत या व्यापाऱ्यांने शेतकऱ्यांना कोटींना गंडविल्यानंतर बाजार समितीने कांद्याच्या पट्ट्या शेतकऱ्यांना रोख स्वरूपात देणे बंधकारक केल्याने व्यापाऱ्यांना ठराविक भांडवलात व्यवसाय करावा लागत असल्याने कांदा हा कमी दरात खरेदी होत असल्याचे एका कांदा व्यापाऱ्यांने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

कांदा लिलावा दरम्यान एकाच शेतातील कांदा दोन वाहनात आणलेला असतांना व्यापाऱ्यांने छोट्या वाहनातील कांदा पंधराशे रुपये दराने तर त्याच शेतातील मोठया वाहनात आणलेला कांदा हा बाराशे रुपये दराने घेतल्याचा सांगत व्यापारी शेतकऱ्यांना लुबाडत असल्याचा आरोप केला.



शहरालगत असलेल्या कांदा मार्केटमध्ये व्यापारी मनमानी दराने कांदा खरेदी करत असल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी शुक्रवार (ता.२१) रोजी सकाळच्या सुमारास जोरदार घोषणाबाजी करत लिलाव बंद पाडून कांदा मार्केटच्या मुख्य प्रवेशद्वाराला टाळे ठोकले.

नागपूर-मुंबई महामार्गालगत असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कांदा मार्केट मध्ये मागील दोन दिवसांपासून कांद्याची आवक बऱ्या प्रमाणात वाढली आहे. शुक्रवारी जवळपास तीनशे वाहनं कांद्याची आवक याठिकाणी झाली होती. सकाळच्या सत्रात कांद्याची लिलाव प्रक्रिया सुरू झाली. मात्र, व्यापाऱ्यांनी हलका कांदा आठशे रुपये तर उच्च प्रतीचा कांदा बाराशे रुपये प्रति क्विंटल अशा दराने खरेदी करण्यास सुरुवात केल्याने शेतकऱ्यांनी लिलाव तत्काळ बंद पाडला. पश्चिम महाराष्ट्रातील बाजार पेठात उच्च प्रतीच्या कांद्याला वाढवा भाव मिळत असताना येथे बाराशे रुपये भाव कसा ? असा प्रश्न यावेळी शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांना करत जोरदार घोषणाबाजी केली. दरम्यान हा सर्व घटनाक्रम सुरू असताना बाजारसमितीचा एक संचालक वगळता इतर कोणत्याही संचालकाने याठिकाणी येण्याची तसदी घेतली नाही. शेतकऱ्यांनी रौद्ररूप धारण केल्याने सचिव प्रल्हाद मोटे यांनी व्यापारी व शेतकऱ्यांमध्ये मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. यावेळी लिलाव पुन्हा सुरू झाला. मात्र थोड्या वेळाने दराच्या मुद्यावरून शेतकऱ्यांनी पुन्हा लिलाव बंद पाडला. यानंतर शेतकऱ्यांनी कांदा बाजाराच्या मुख्य प्रवेशद्वाराला टाळे ठोकून जोरदार घोषणाबाजी केली. दरम्यान बाजार समितीचे पदाधिकारी हे व्यापाऱ्यांच्याच ओंजळीने पाणी पित असल्याचा आरोप यावेळी शेतकऱ्यांनी केला. दुपारी तीन वाजेपर्यंत कांदा लिलाव सुरू होऊ शकला नव्हता.